से-का-प

३५५

॥ श्री ॥

# भर्तृहरिकृत शृंगारशतक.

श्लोक ( वसंततिलका )

शम्भुस्वयम्भुहरयो हरिणेक्षणानां ।
येनाक्रियन्त सततं गृहकर्मदासाः ॥
वाचामगोचरचरित्रविचित्रिताय ।
तस्मै नमो भगवते कुसुमायुधाय ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
काव्य ३५७ . स. १८९८
ले. भर्तृहरिकृत
शृंगारशतक.

[illegible] शतकावर [illegible] आहे

से-०,८०५ ८.८.१

३४५

॥ श्री ॥

# भर्तृहरिकृत शृंगारशतक.

श्लोक ( वसंततिलका )

शम्भुस्वयम्भुहरयो हरिणेक्षणानां ।
येनाक्रियन्त सततं गृहकर्मदासाः ॥
वाचामगोचरचरित्रविचित्रिताय ।
तस्मै नमो भगवते कुसुमायुधाय ॥ १ ॥

( मालिनी )

हरविधिहरि जेणें दास केले स्त्रियांचे ।
चरित अतुल ज्याचें वर्णवे हा न वाचें ॥
त्रिभुवनविजयी जो पुष्पधन्वा[1] तयाला ।
सकलसुरवरिष्ठा म्यां नमस्कार केला ॥ १ ॥

( रथोद्धता )

मंद हास निजभाव दावणें ।
बोल लाज परतोनि पाहणें ॥
खेळणें झगडणें न हांसणें ।
स्त्रीस्वभाव अवघेच बंधनें ॥ २ ॥

( वसंतति० )

भ्रूभंगयोजित कटाक्ष हि गोडवाणी ।
दावूनि हास्य आणि त्यांतहि लाज आणी ।

---

१ फूल हेंच आहे धनुष्य ज्याचें असा ( काम )

की चालणें हळूचि थोपुनि राहणें हें ।
कांतास शस्त्र अणि भूषण हेंच पाहें ।। ३ ।।

( अनुष्टुप् )

आतां करूं कसें कोठें जाऊं या निर्मिल्या कशा ।।
यांच्या त्रिचित्रनेत्राब्जीं व्यापिल्या सर्वही दिशा ।। ४ ।।

( स्वागता )

चंद्रतुल्य मुख राजस डोळे ।
स्वर्णवर्ण वपु, कुंतल काळे ।।
मांसल स्तन नितंब हि लेणें ।
हें स्त्रियांप्रति अकृत्रिम बाणे ।। ५ ।।

( वसंतति० )

डोळे विशाळ अणि चंचळ मंद हास्य ।
चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास ।।
शोभा हरी चरण कोमळ पल्लवांची ।
कीं चांगलीच तरुणत्वदशा स्त्रियेची ।। ६ ।।

( वसंतति० )

प्रेमप्रसन्न वनितामुख पैं पहावें ।
कर्णीं तिचें वचन सादर आयकावें ।।
आस्वादिजे तदधरामृत ते स्मरावी ।
ते स्पर्शिजे ह्मणुनि तन्मय तीस भावी ।। ७ ।।

( भुजंगप्र० )

झणत्कार ज्यांच्या पदीं नूपुरांचा ।

१ सुंदर २ सोन्याच्या रंगाचें. ३ शरीर. ४ केश. ५ भूषण. ६ पाठ–जाणें ७ तिच्या अधरोष्ठाचें अमृत.

रुणत्कार ज्यांच्या करीं कंकणांचा ॥
कुरंगेक्षणा[1] ज्या स्वनेत्रांतपातें ।
हरीनात कोणाचिया मानसातें ॥ ८ ॥

( दोधक )

पीन जिचे कुच शोभति हारी ।
केशरचंदनचर्चित गौरी ॥
नूपुरशब्द पदाब्जविहारी[2] ।
ते कवणा न करी वश नारी ॥ ९ ॥

( गाथा )

अबला या वदताति जे स्त्रियांला ।
कवि त्यांला विपरीत बोध झाला ॥
जित केले सुर सर्व दृष्टिपातें ।
अबला हें ह्मणिजे कसें तयातें ॥ १० ॥

( अनुष्टुप )

सत्य आज्ञाकार तीचा मकरध्वज भासतो ।
तन्नेत्रसूचितस्थानीं[3] वेगें तात्काळ धांवतो ॥ ११ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

मोठे संयमशील केश नयन श्रुत्यंत ही पावले ।
अंतर्वक्त्र सुनिर्मलद्विजगणीं जें सर्वदां सेविलें ॥
मुक्तांचा सहवास नित्य त्हदयीं सद्वृत्तताही स्तनीं ।
ऐसें शीत शरीर ताप करितें कां सांग वो कामिनी ॥ १२ ॥

---

१ हरिणासारखे आहेत नेत्र ज्यांचे अशा ( स्त्रिया )
२ पादकमलाच्या ठिकाणीं उत्पन्न होणारा. ३ तिच्या नेत्रांनीं दाखविलल्या जागीं.

की चालणें हळूचि थोपुनि राहणें हें ।
कांतास शस्त्र अणि भूषण हेंच पाहें ।। ३ ।।

( अनुष्टुप् )

आतां करूं कसें कोठें जाऊं या निर्मिल्या कशा ।।
यांच्या विचित्रनेत्राब्जीं व्यापिल्या सर्वही दिशा ।। ४ ।।

( स्वागता )

चंद्रतुल्य[१] मुख राजस डोळे ।
स्वर्णवर्ण[२] वपु[३], कुंतल[४] काळे ।।
मांसल स्तन नितंब हि लेणें[५] ।
हें स्त्रियांप्रति अकृत्रिम बाणे ।। ५ ।।

( वसंतति० )

डोळे विशाळ अणि चंचळ मंद हास्य ।
चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास ।।
शोभा हरी चरण कोमळ पल्लवांची ।
कीं चांगलीच तरुणत्वदशा स्त्रियेची ।। ६ ।।

( वसंतति० )

प्रेमप्रसन्न वनितामुख पैं पहावें ।
कर्णी तिचें वचन सादर आयकावें[६] ।।
आस्वादिजे तदधरामृत[७] ते स्मरावी ।
ते स्पर्शिजे ह्मणुनि तन्मय तीस भावी ।। ७ ।।

( भुजंगप्र० )

झणत्कार ज्यांच्या पदीं नूपुरांचा ।

---

१ सुंदर २ सोन्याच्या रंगाचें. ३ शरीर. ४ केश. ५ भूषण.
६ पाठ—जाणें ७ तिच्या अधरोष्ठाचें अमृत.

रुणत्कार ज्यांच्या करीं कंकणांचा ॥
कुरंगेक्षणा ज्या स्वनेत्रांतपातें ।
हरीनात कोणाचिया मानसातें ॥ ८ ॥

( दोधक )

पीन जिचे कुच शोभति हारीं ।
केशरचंदनचार्चित गौरी ॥
नूपुरशब्द पदाब्जविहारी ।
ते कवणा न करी वश नारी ॥ ९ ॥

( गाथा )

अबला या वदताति जे स्त्रियांला ।
कवि त्यांला विपरीत बोध झाला ॥
जित केले सुर सर्व दृष्टिपातें ।
अबला हें ह्मणिजे कसें तयांतें ॥ १० ॥

( अनुष्टुप )

सत्य आज्ञाकार तीचा मकरध्वज भासतो ।
तन्नेत्रसूचितस्थानीं वेगें तात्काळ धांवतो ॥ ११ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

मोठे संयमशील केश नयन श्रुत्यंत ही पावले ।
अंतर्वक्त्र सुनिर्मलद्विजगणीं जें सर्वदा सेविलें ॥
मुक्तांचा सहवास नित्य त्हदयीं सद्वृत्तताही स्तनीं ।
ऐसें शीत शरीर ताप करितें कां सांग वो कामिनी ॥ १२ ॥

---

१ हरिणासारखे आहेत नेत्र ज्यांचे अशा ( स्त्रिया ) २ पादकमलाच्या ठिकाणीं उत्पन्न होणारा. ३ तिच्या नेत्रांनीं दाखविलल्या जागीं.

श्लोक ( अनुष्टुप् )

मुग्धे अपूर्व तुझि हे धनुष्मता दिसे निकी ।
विंधिसी लोकचित्तांतें गुणांहीं च न सायकीं ॥ १३ ॥

( अनुष्टुप )

असो दीप असो अग्नी असोत मणि सर्व रे ॥
अंधकार विना कांतामुखचंद्रें न संहरे ॥ १४ ॥

( शिखरिणी )

स्वभावें उद्वृत्त[1] स्तन चपळ हें लोचनयुगें ।
तसा रागी[2] ओष्ठ प्रकृतिकुटिल[3] भ्रूभ्रमण गे ॥
करी पीडा मातें तदपि तव सौभाग्यलिपिका ।
करी कष्टी मध्यस्थित असुनियां रोमलतिका ॥ १५ ॥

( अनुष्टुप )

भास्वद्देहशशी[4] वक्र गुरुही स्तनभार तो ॥
शनैश्चर पदद्वंद्व ग्रहरूप विराजते ॥ १६ ॥

( वसंततिलका )

मांड्या नितंब जघन स्तन पुष्ट तीचे ।
पूर्णेंदु साम्य न धरी सखिच्यामुखाचें ॥
हें आकुलत्व आणि टाकुनिया मना तूं ।
साधीं महासुकृत सर्वसुखैकहेतू ॥ १७ ॥

श्लोक ( उपजाती )

मल्यांस मी प्रार्थितसें स्वभावें ।
मात्सर्य टाकोनि निकें वदावें ॥

---

१ वर आलेले. २ आरक्त. ३ स्वभावतः वक्र. ४ तेजस्वी आहे देह ज्याचा असा चंद्र.

नितंब सेवूं धरणीधरांचे ।
किंवा मदोन्मत्तविलासिनींचे ॥ १८ ॥

( शार्दूलवि० )

हा संसार असार त्यांत हि गतीं या दोन अत्युत्तमा ।
ब्रह्मानंदसुखेंचि काल हरणें टाकूनि मायाभ्रमा ॥
कांतेचे कुचकुंभ पुष्ट भग त्या मांड्या महासुंदरा ।
त्यांतें कीं कुरवाळिती रतिभरें हा काळ गेला बरा ॥१९॥

श्लोक ( अनुष्टुप् )

चंद्रकांत तिचें वक्र महानील हि केश ते ।
पद्मरागपदद्वंद्वीं रत्नरूप विराजते ॥ २० ॥

श्लोक ( वसंततिलका )

* मोहें मदांध करिताति विडंबना ती ॥
धिःकारितीं, रमति खेदहि मानिताती ॥
कारुण्यसिंधुनर-चित्तिं रिघोनिया कीं ॥
या काय वामनयना करिती न लोकीं ॥ २१ ॥

( गीति )

थोपत थोपत जाते कोणी रमणी वनद्रुमच्छाये ।
वारी चंद्रकरातें उचलुनी पदरा जयाचिया सोये ॥ २२ ॥

( उपजाति )

न देखतां दर्शनलोभ दाटे ।
जे देखिल्या उत्सव केंवि भेटे[1] ॥
आलिंगितां काम[2] असा उदेजे ।
देहद्वया भेद कदा न कीजे ॥ २३ ॥

---

१ आलिंगन देई २ इच्छा

( भुजंगप्र० )

बरा चंदनालेपदेहासि साजे ।
शिरीं मालतीपुष्पमाला विराजे ॥
उरीं कामिनी जीस तारुण्य माजे ।
असें सौख्य ज्या तेथ त्या स्वर्ग गाजे ॥ २४ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

आरंभींच नको नको सखि वदे त्यानंतरें सोडितां ।
नीविग्रंथि सलज्ज पैं हळुहळू ते डोल दे वोढितां ॥
टाकी धैर्य रत प्रियासह भरें संभोग तो माजतां ।
अंगें उद्यम ही करी सरि नसे ऐशा कुलस्त्रीरता ।२५।

( शिखरिणी )

पहा संभोगांतीं उपरि सुरतश्रांत ललना ।
उरीं लोडे डोळे उघडि अणि झांकीं सुनयना ॥
असे गंडद्वंद्वीं पुलकित बरी मुक्तकबरी ।
तिची गोडी घेतो कुशल जन चाखूनि अधरीं ।२६।

श्लोक ( शिखरिणी )

※ अहो किंचिन्नेत्रद्वय मिटुनि जे सुंदरि बत्रे ।
तियेच्या संभोगीं खचित वसतें सौख्य अववें ॥
अनंगाग्निज्वाला प्रखर परि कीं त्याहि शमवी ।
सदा सर्वाकाळीं मिथुन स्वमनीं हेंचि मिरवी ॥२७॥

( वसंतति० )

हा थोर अक्रम नव्हे उचित प्रसंग ।
वृद्धास ही पर विकार करी अनंग ॥
तों भोग जीवनहि जों स्तनपात नाहीं ।

कामा ८८



केलें न पंकजभवें चतुरें असें ही ॥ २८ ॥

आर्या

* उभय मनें एक तरी रतिरसमाधूर्य तें निकें कळतें ॥
अन्यत्र चित्त होतां शवसंगम सम हृदा अहा गमतें २९

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

* शृंगारें शिथिला सनम्रमधुर प्रेम प्रयुक्ता अशी ॥
कामोद्दीपक मोहदायक अहा पीयूष धारा जशी ॥
स्वाभावीक सुरम्य मुग्धसम कीं विश्वासरूपा अहा ॥
एकांतातिल रंजवी युवतिची वाणी मनातें पहा ॥ ३० ॥

( अनुष्टुप )

करावा वास गंगेच्या सलिलीं पाप हारीजे ।
अथवा तरुणीपीनस्तनाभ्यंतर सेविजे ॥ ३१ ॥

( अनुष्टुप् )

राहे तोंवरि कांतेच्या हृदयीं क्रोध दारुण ।
संचार न करी जों हा चंदनाद्रिसमीरण ॥ ३२ ॥

( द्रुतवि० )

परिमलान्वित वायु नवांकुरीं ।
तरु विराजित फार वनांतरीं ॥
शुकपिकप्रमदाजन माजतो ।
बहु तयांस वसंत नवाजितो ॥ ३३ ॥

( स्वागता )

कोकिळध्वनि सुशीतळ वारे ।

---

१ कमलापासून आहे जन्म ज्याचा असा ( ब्रह्मदेव ) २ मैना कोकिळा आणि स्त्रिया.

काळ उत्तम वसंत पहा रे ॥
कामिनीविरह वेध जयाला ।
दुःखदायक समस्त तयाला ॥ ३४ ॥

( इन्द्रवज्रा )

द्वारीं लतामंडप रम्य नारी ।
पुष्पें पिकालाप परोपकारी ॥
गोष्ठी कवींशीं हिमरश्मिसेवा ।
ज्या सौख्य हें तोच गृहीं वदावा ॥ ३५ ॥

( उपजाती )

शोभा धरी स्त्री विरहानलाची ।
जे मंजरी आम्रमहीरुहाची ॥
पिकावली सादर तीस पाहे ।
श्रीखंडशैलोद्भव वायु वाहे ॥ ३६ ॥

( उपजाति )

आम्रद्रुमीं बार उठे वसंतीं ।
सौरभ्य[1] संचार करी दिगंतीं ॥
करी द्विरेफावली[2] जैं तनाना ।
कोणास तैं काम कशीं कशींना ॥ ३७ ॥

साक्या

* स्वच्छ सुचंदन-रसार्द्रहस्ता कुरंग नयना बाळा ॥
धारागृह, विधुकांति मनोहर कुसुमाची नव माळा ॥
मंदवायु मालती वल्लरी हर्म्य-पृष्ठ शुचि हो ते ॥
निदाघकालीं वाढविती कीं हर्ष काम हृदयीं ते ३८

---

१ सुवास. २ भ्रमरपंक्ति.

( वसन्ततिलका )

उद्दाम हार घनसार विलेप चंद्र ।
माडी सुमद्य पवन व्यजनीय सांद्र ॥
कांता मनोज्ञ सुख रे वसनें उन्हाळा ।
हा सोहळा सुकृतपुंज जया तयाला ॥ ३९ ॥

( शार्दूलवि० )

माडी शुभ्र सुधांशु पूर्ण रमणीवक्त्राब्ज माळा फुलें ।
श्रीखंडद्रव जो वरा मंगमगी[१] हें सर्व जें बोलिलें ॥
येणें क्षोभ घडे तयास हृदयीं जो मन्मथें जिंकिला ।
यांतें पाहुनि ही कदापि न ढळे जो कां विरागी भला ।४०।

( अनुष्टुप् )

कोणास न करी हर्ष वर्षा हे तरुणीपरी ।
पयोधरें पुष्पगंधें मदना माजवी बरी ॥ ४१ ॥

( कलहंस )

नवमेघवृंद गगनीं धरणी हे ।
जलपूरजर्जरित होउन राहे ॥
शिखिकूजनें मिरवतें वन जेव्हां ।
नर हृष्ट खिन्न हि समुत्सुक तेव्हां ॥ ४२ ॥

( आर्या )

वर्ते पटल घनाचें नर्तन करिती महीवरी मोरें ।
भूतल हिरवें पथिकें सोडावी दृष्टि कोठें रे । ४३ ।

( उपजाति )

विद्युल्लता हे नव केतकी हे ।

१ घमघमीत.

हे मेघ हें बर्हिणनृत्य पाहें ॥
चहूंकडे हे सुटली घुमाळी ।
वियोगवत्स्त्री सखि कैंवि टाळी ॥ ४४ ॥

( पृथ्वी )

न मार्ग हि दिसे असे तम तमाम वेष्टी दिशा ।
नभीं जळदवृंद त्यास्तव हि माजलीसे निशा ॥
अशा समयिं ना कशी झळकतांचि विद्युल्लता ।
प्रमोद भय ही धरी स्वमनिं जारिणी चालतां ॥ ४५ ॥

( स्वागता )

वर्षतां घन गृहीं निज नारी ।
पोटिशीं धरुनि घुंगट मारी ॥
दुर्दिन प्रियतमाकुचसंगें ।
होतसे सुदिन हो रतिभोगें ॥ ४६ ॥

( मालिनी )

करुनि निधुवनातें जो भिजेला श्रमोनी ।
तृषित मग निशीथीं तोय मागे उठोनी ॥
शिशिर जल सखी दे गात्र संक्रांत जीचें ।
अतुळ सुख असें हें मंदभाग्यासि कैंचें ॥ ४७ ॥

( वसंतति० )

मिष्टान्न आज्य दधि दुग्ध यथेच्छ झोडी ।
तांबूल कुंकुम विलेपन भोग गोडी ॥
स्त्री पोटिशीं धरुनियां सखल्लात वोढी ।
खोलींत शेज हिमरात्रि तयासि थोडी ॥ ४८ ॥

( वसंतति० )

ओष्टीं करी व्रण हि चुंबुनि गंडदेशीं ।

स्न्॰१वि: — ८९



निर्मी कसा पुळक पीनकुचद्वयाशीं ॥
वस्त्रांत ही घुसतसे जघनासि झोंबे ।
जारापरी शिशिरवायु रते न थांबे ॥ ४९ ॥

( इंद्रवज्रा )

केशा करी व्याकुळ नेत्र झांकवी ।
बळेंचि वस्त्रें उडवी थरारवी ॥
सीत्कार दंतासि रची समीर हा ।
कांतासवें शैशिर पैं रते पहा ॥ ५० ॥

श्लोक ( वसंतति० )

* निःसार हा विषय नीरस भूमी भागीं ।
दोषार्ह निंद्य ह्मणती जरि अंतरंगीं ॥
आत्मस्वरूपरत त्या स्फुरणासि देतो ।
नारि प्रभावचि अनिर्वचनीय होतो ॥ ५१ ॥

साकया

* वेदान्तीं जें मग्न सदोदित हितकर गुरु तुह्मि त्यांचे ।
नानाविध वच वदति कवी जे तत्किर अह्मि साचे ॥ १ ॥
परोपकाराविना पुण्य ना या महिलोकीं जेवी ।
कमलाऽक्षी सम अन्य नसे कीं सुमनोहर जगीं तेवी । ५२ ।

( स्वागता )

युक्तिशून्य बहु बोलुनि काय ।
सौख्यदायक तिजा न उपाय ॥
कामिनीकुचयुगा कवळावें ।
कीं वनाप्रति उठोनि पळावें ॥ ५३ ॥

( उपजाति. )

मी बोलतों सत्य न पक्षपातें ।

जें सत्य लोकांतहि मान्य होतें ॥
मनोहर स्त्रीसम आन नाहीं ।
तत्तुल्य दुःखप्रद ही न कांहीं ॥ १४ ॥

( भुजंगप्रयात )

भव्यांच्या मनोमंदिरामाजि तोंच ।
विवेकप्रदीप स्फुरे स्पष्ट साच ॥
तयातें कटाक्षांचलें जों न मारी ।
कुरंगेक्षणा यौवनोन्मत्त नारी ॥ १५ ॥

( इन्द्रवज्रा )

वाचाळ रे पंडित लोक जे ते ।
वैराग्य त्यांचें वचनींच साजे ॥
जो कामिनीच्या जघना भुलेना ।
ऐसा असे कोण मला कळेना ॥ १६ ॥

( वसंतति० )

मोठा प्रतारक हि पंडित लोक पाहें ।
निंदी स्त्रियां तदभिलाष मनांत वाहे ॥
नानातपीं घडतसे सुरलोकवास ॥
तेथें परंतु सुखद प्रमदाविलास ॥ १७ ॥

( वसंतति० )

आहेत शूर मदवारणकुंभभेत्ते ।
या भूतळीं कितिक सिंहविनाशकर्ते ॥
सर्वांपुढें करुनि मीच वदें तथापि ।
शूरांत तो विरळ जो स्मरगर्व दापी ॥ १८ ॥

श्लोक ( स्रग्धरा )

सन्मार्गी तोंच राहे प्रभुपण मिरवी तोंच त्या इंद्रियांचें ।
लज्जेतें तोंचि वाहे विनतपण निकें दावितो तोंचि साचें ॥
भ्रूचापा ओढुनीयां श्रवणपथवरी मारिला नेत्रबाणीं ।
नाहीं जों कामिनींहीं पुरुष मिरवितो तोंचि हीं सर्व लेणीं ९९

( उपजाती )

अत्युत्कट प्रेमभरें स्त्रिया हो ।
ज्या ज्या क्रियेचा धरितील लाहो ॥
करूं शके विघ्न न तो विधाता ।
तेथें दुजाची मग काय वार्ता ॥ १० ॥

( उपजाति )

महत्व पांडित्य कुलीनता जे ।
विवेक अत्युत्तम तोंचि साजे ॥
देहीं न जों तो मदनाग्नि पेटे ।
दे या समस्तांसहि जो चपेटे ॥ ११ ॥

( शिखरिणी )

तरे या संसारीं विरल जन आत्मज्ञ सुकृती ॥
विवेकी वेदांतश्रवणविनयोपस्कृतमती ॥
स्त्रियेची भ्रूकुंची नरकनगराचींच कुलुपें ।
बळें उद्घाटीत्या स्थलिं जन भरे टाकुनि तपें । १२ ।

( शा०वि० )

काणें रोड विपुच्छ कर्णदुबळें पोटाविणें लंगडें ।
अंगीं घाय तयांत पूं आणि किडे हें ही असो थेरडें ॥
ऐसें श्वान चढे शुनीवरि गळां ज्या कांठमोरा असे ।
मेल्यातें स्मर मारितो रगडुनी बेटयास लज्जा नसे १३

२

( उपजाति० )

स्त्रीयोनिमुद्रा मकरध्वजाची ।
सर्वार्थसिद्धिप्रद जाण साची ॥
न मानिती जे स्मर त्यांस दंडी ।
लावी भिके नग्न जटाळ मुंडी ॥ १४ ॥

श्लोक ( शार्दूल विक्रिडीत. )

*विश्वामित्र पराशर प्रभृति जे वातांबुतें सेविती ।
तेही पाहुनि स्त्री मुखांबुज अहा चित्तीं अती मोहती ।
आह्मीं दुग्ध दधी घृतेंयुत महा शाल्यन्न भोक्ते जरी ॥
लागे इंद्रिय निग्रहीं तरि तरे विंध्याद्रि ते सागरीं । १५

( वसंत ति० )

या निर्मिल्याच नसत्या जरि रम्य नारी ।
सौंदर्ययौवनविभूषण ज्यांस भारी ॥
सेवागुणें सकल टाकुनियां विवेक ।
कां सेविते खळनृपांगण थोर लोक ॥ १६ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

जेथें सिद्धजनीं स्वआश्रयकुट्या[1] स्वानंद हो सेविल्या ।
खांदा घांसुनि जेथ शंकरवृषें[2] वृक्षत्वचा काढिल्या ॥
जेथें या मदनास्त्रचंचलदशा नाहींत उच्छृंखला ।
ऐसा तो असतां हिमाचल लवे कां हो मनस्वी खला । १७ ।

( अनुष्टुप )

संसारीं मोक्षपदवी दुरी नाहीं विचक्षणा ॥
मध्यें या दुस्तरा नसत्या जरी हो मदिरेक्षणा । १८ ।

---

१ पर्णशाळा. २ नंदी.

( भुजंगप्रयात )

न कोणीच तृष्णासमुद्रांत पारे ।
नृपा जोडि कां व्यर्थ तारुण्य धांवे ॥
जरेनें न जों जर्जरीभूत केली ।
मृगाक्षीगृहा जाइजे तोंचि हाली ॥ ६९ ॥

( मालिनी )

गृह विषयरतीचें हेतु जे दुर्गतीचे ।
घनपटल[1] असे जें ज्ञानताराधिपाचें[2] ॥
मदनसुहृद बीज भ्रांतिदोषादिकांचें ।
अघजनक[3] जनीं या यौवनावीण कैंचें ॥ ७० ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

शृंगारद्रुम त्यास होय जलद क्रीडारसाची नदी ।
जें कामप्रियमित्रमौक्तिकवचोमुक्ता[4] तया अंबुधी[5] ॥
कांतानेत्र चकोर त्यास विधि जें सौभाग्यभांडार जें ।
ऐसें यौवन पातल्या न विचले तो धन्य हा बोलिजे ७१

श्लो० ( शार्दूलवि० )

कांते पंकजलोचने[6] विपुल हे श्रोणी तुझी नेटकी ।
सुभ्रू तूं जलजानने[7] तटतटी पीनस्तनी कंचुकी ॥
ऐसें आळवुनी प्रियेस करि तो संभोगितो वानितो ।
ज्ञाता ही अपवित्र नेश्वर असें जाणोनही मोहतो ७२

श्लो० ( अनुष्टुप् )

स्मरतां करिते ताप पाहतांच करी पिसें ॥
स्पर्शितां भुलवी जे ते दयिता बोलिजे कसें ॥ ७३ ॥

---

१ मेघमंडळ. २ ज्ञानरूप चन्द्राचें. ३ पातक उत्पन्न करणारें. ४ युक्तींचें भाषण हेंच मोती. ५ समुद्र. ६ कमलनयने ७ कमलमुखी.

( आर्या )

*अमृत सम मधु जाणा जों वरि दृष्टी पुढें उभी युवती ॥
होतां आड विषापरि भासे चित्तासि तीच कीं सुमती ७४

( भुजंगप्र० )

नसे स्त्रीविना आन पीयूष[1] जाण ।
नसे कोळकूट[2] स्त्रियेवीण आन ॥
सुधा तेच कांताऽनुकूलस्वभावें ।
विषप्राय जें तेचि अन्यत्र धांवे ॥ ७५ ॥

श्लोक ( स्रग्धरा )

जो डोहो संशयाचा अविनयग्रह जो ग्रास जो साहसाचा
दोषा जें क्षेत्र जें कां कपट आणि अविश्वास हेवा तयाचा ॥
स्वर्गाचें विघ्न नाना नरकमुख महामोह त्याचीच पेटी ।
कोणें स्त्री निर्मिली हे विष अमृत गमे पाश हे सर्व सृष्टी ॥

श्लोक० ( इंद्रवज्रा )

चंद्राची मुखसाम्यता मुखाला ।
कीं फुलांबुजतुलना विलोचनाला ॥
त्वग्मांसप्रचुर जयांत हाडें ।
स्त्रीदेहा कनक वदे कवीश वेडे ॥ ७७ ॥

श्लो० ( इन्द्रवज्रा )

विलासिनीची सहज क्रिया जे ।
मूढाचिया ते हृदयांत डाजे ॥
स्वभावयोगें नलिनी[3] विकासे ।
तेथें फिरे गुंजुनि भृंग आसें ॥ ७८ ॥

---

१ अमृत. २ विष. ३ कमलिनी. ४आशेने.

( उपजाति )

जें पूर्णचंद्रोपम कामिनीचें ।
मुखाब्ज रे पात्र सुधारसाचें ॥
तारुण्य जातां मग तेउतेंच ।
विषापरी होइल जाण साच ॥ ७९ ॥

( कलहंस )

त्रिवली तरंग मुख तेंच सरोज ।
आणि चक्रवाकयुग जाण उरोज ॥
वनितानदी कुटिल हे निजसंगें ।
भवसागरीं बुडविते सर मार्गें ॥ ८० ॥

श्लो० ( अनुष्टुप् )

चिंती एकास एकातें पाहे बोले दुजासवें ॥
स्त्रियेला प्रिय जो होणें हें कदापि न जाणवे । ८१ ।

श्लो० ( शिखरिणी )

* मुखेच्या माधुर्या धरिति युवती आत्मवचनीं ।
परी सारंगाक्षा प्रखर विष तें ठेविति मनीं ॥
अहा हे कामार्थी नर-अधर-पीयूष पिउनी ।
स्वहस्तें मर्दीती कठिण हृदय प्रांत ह्मणुनी ॥ ८२ ॥

( उपजाति )

विलास तें तोंड बरें फणाचें ।
कटाक्ष हालाहल तें जयाचें ॥
स्त्रीसर्प तो टाकुनि त्यास जाई ।
तद्दृष्ट[1] जे यांस उपाय नाहीं ॥ ८३ ॥

---

१ तो ज्यांस चावला आहे ते.

( वसंततिं० )

स्त्री हा महागळ पहा स्मरधीवराचा ।
विस्तारिला भवसमुद्रजळांत साचा ॥
जे झोंबताति नरमीन तया गळासी ।
काढूनि रागदहनीं शिजवी तयांसी ॥ ८४ ॥

( अनुष्टुप् )

स्त्रीदेहवन त्यामाजी कुचपर्वत ते स्थळीं ।
न फिरें रे मना तेथें स्मरचोर वसे बळी ॥ ८५ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

तेजस्वी अतिदीर्घ वक्र चपल श्यामांग भोगी[1] अही[2] ।
कांतेचा परिवास मस्तकगुणी संयुक्त दृष्टीसही ॥
तो झोंबे जरि सर्प त्याप्रति असे मंत्रौषधादि क्रिया ।
कांहीं मंत्र उपाय भेषज[3] नसे स्त्रीदृष्टिदष्टास या ॥ ८६ ॥

श्लोक ( मालिनी. )

* रस, परिमल, गीती नृत्य भोक्के तयांनीं ॥
कठिण नवकुचाग्रा स्पर्श या इंद्रियांनीं ॥
भ्रमण तुज कराया लाविलें वंचुनीया ॥
अनुपम परमार्थी त्वाद्धिता सांडुनीया ॥ ८७ ॥

श्लोक ( शिखरिणी )

न मंत्रें आटोपे किमपि न जया औषध दिसे ।
व्रतें दानें होमें उपशम न ज्याच्या घडतसे ॥
स्मरापस्माराख्य प्रबळतर हा रोग भुलवी ॥
पिसें लावी तेणें नर विकळ तो नेत्र फिरवी ॥ ८८ ॥

---

१ फडा असलेला. २ सर्प. ३ औषध.

श्लोक ( शार्दूलवि० )

जात्यंधाप्रति दुर्मुखाप्रति तथा वार्द्धक्ययुक्ताप्रति ।
कीं मूर्खाप्रति दुष्कुलाप्रति गलत्कुष्ठें मळाल्याप्रति ॥
द्रव्याशेस्तव वोपिती निजतनू वेश्या अशा वोंगळा ।
त्यांसीं कोण रतेल नश्वरसुखज्ञाता विवेकी भला । ८९ ।

श्लो० ( अनुष्टुप् )

वेश्या हे मदनज्वाला माजली यौवनेंधनें[1] ॥
कामातुर सदा तेथें होमिती यौवनें धनें ॥ ९० ॥

( वसंतति० )

जासूद भाट भट भांड विटादिकांनीं ।
केलें असे मुख जिचें जारि पीकदानी ॥
शोभा तिच्या वसत यद्यपि ओष्ठबिंबीं ।
कोण्ही कुलीन नर उत्तम त्यास चुंबी ॥ ९१ ॥

( वसंतति० )

विस्तीर्ण आणि अतिचंचल नेत्र ज्यांचे ।
कीं पुष्ट यौवनमदस्तन ही जयांचे ॥
मंदोदरी त्रिवलीयुक्त अशां स्त्रियांतें ।
पाहोनि जे न ढळती नर धन्य ते ते ॥ ९२ ॥

श्लोक ( शिखरिणी )

*वृथा किंचिन्नेत्रा मिटुनि बघसी कां मजकडे ।
पुरे आतां, होती श्रम तुज विनाकारण गडे ॥
न पूर्वीचे आह्मीं सुमति सरलें बाल-पण तें ।
वनेच्छा मोहान्ती रुचत, जगतीं तुच्छ गमतें ॥ ९३॥

---

१ तारुण्य हेंच कोणी सर्पण त्यानें.

( मालिनी वृत्त )

*सतत मजवरी ही नील नेत्रासि लावी ।
नुमजत मनिं ईच्या काय इच्छा असावी ॥
मदन दमन झालें, मोह तो ही निमाला ।
फिरवि न परि दृष्टी आपुली मुग्ध बाला ॥ ९४ ।

श्लोक ( शार्दूल वि० )

वाडा स्वच्छ मनोहर प्रियतमा छत्रें विराजे रमा ।
ऐसें शाश्वत मानुनी अनुभवी पावे महा संभ्रमा ॥
तें याला नकळे स्वपुण्य सरतां होईल हो त्यापरी ॥
दाणादाण सुतंतु मात्र तुटतां मुक्ताफळें ज्यापरी ॥ ९५ ॥

( शालिनी )

योगाभ्यासें चित्तचैतन्यमैत्री ।
केली जेहीं जे निजानंद धात्री ॥
ज्या ज्या रंगें मूढधी वश्य केले ।
बाजेगारी त्यांपुढें हे न चाले ॥ ९६ ॥

( पृथ्वी वृत्त. )

*किमर्थ करिसी स्मरा सुमधनु ध्वनी आपुला ।
निरर्थ शिणतोसि कां मधुर गायनीं कोकिला ॥
कटाक्षशर आवरी चतुर स्निग्ध शंपेपरी ।
त्रिनेत्र पद पंकजीं स्वमन रंजलें सुंदरी ॥ ९७ ॥

( इंद्रवज्रा )

जैं व्यापिली कामतमें स्वदृष्टि ।
तैं देखिली स्त्रीमय सर्व सृष्टि ॥
आतां विवेकांजन अंजितां हें ।
सर्वत्र मी चिन्मयरूप पाहें ॥ ९८ ॥

( वसंतति० )

*वैराग्य मंदिरिं कुणी मन रंजवीती ।
कित्येक नीति सदनीं रममाण होती ॥
शृंगार आद्य रस तो कितिएक पीती ।
ऐशी असे जगिं परस्पर भेद रीती ॥ ९९ ॥

श्लोक ( वसंतति० )

जे सांद्र मांसल कुच द्विप[1]कुंभ जैसे ।
पोटाळुनी हृदयिं खिन्न रतिप्रयासें ॥
निद्रा करी निजकरीं धरिला प्रियेनें ।
तो धन्य ज्यास रजनी क्षणमात्र माने ॥ १०० ॥

---

१ हत्तीची गंडस्थळें.

॥ श्री ॥

# भर्तृहरिकृत नीतिशतक.

श्लोक ( अनुष्टुप् )

दिक्कालाद्यनवच्छिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये ॥
स्वानुभूत्येकसाराय नमः शान्ताय तेजसे ॥ १ ॥

( भुजंगप्र० )

*दिशाकालयोगें नये भिन्नताती ।
नपे आदिअंतादि, चिन्मात्र—मूर्ती ॥
दिसे तत्वतें स्वानुभूतींच जीतें ।
नमस्कार त्या शांत तेजो निधीतें ॥ १ ॥

( वसंतति० )

मी जीस चिंतित असें न रुचें तिला मी ।
माने तिला अपर तो पर अन्यगामी ॥
संतुष्ट मद्विषयिं आन वधूच पाही ।
धिक् तीस त्यास मदनास इला मलाही ॥ २ ॥

( भुजंगप्र० )

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें ।
धरूं ये सुखें चित्त पैं जाण त्याचें ॥
न जाणे न नेणें अशा पामराला ।
बुझावूं शकेना विधात्या तयाला ॥ ३ ॥

---

१ दुसरा. २ समजावूं.

( शिखरिणी )

बळानें काढूं ये मणि मकर दाढेंत दडला ।
तरूं ये कीं पाथोनिधि बहुत ऊर्मीं गवसिला ॥
महासर्पातेंही सुमसम धरूं ये निजशिरीं ।
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना पळभरी ॥ ४ ॥

( शिखरिणी )

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलही गळे ।
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे ॥
सशाचेंही लाधे विपिनिं फिरतां शृंगहि जरी ।
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना पळभरी ॥ ५ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो ।
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया धांवतो ॥
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिसी आणितो ।
जो मूर्खास सुभाषितें वश करूं ऐसें मनीं बोलतो ॥ ६ ॥

( उपजाति )

विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें ।
स्वाधीन हें पद्मभवें फुकाचें ॥
मूर्खास हें मौनचि फार साजे ।
सभेस त्यांच्या बहु जाणतेजे ॥ ७ ॥

श्लोक ( शिखरिणी )

नधीं कांहीं कांहीं हरि कवि असे शब्द शिकलों ।

---

१ समुद्र. २ लाटांनीं. ३ फुलाप्रमाणें. ४पाठ-क्षणभरी. ५ तहान. ६ सांपडतें. ७ अरण्यांत. ८ कमळाच्या देंठीच्या तंतूंनीं. ९ हिरा. १० शिरीषाच्या फुलानें. ११ ब्रह्मदेवानें.

तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें यात्र भरलों ॥
जधीं कांहीं नेणे ह्मणुनि वदले पंडित मला ।
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला ॥ ८ ॥

(. शार्दूलवि० )

* लाळेनें भरलीं विगंधि, डसलीं जंतूकुलें ज्यावरी ।
मांसाहीन नरास्तिका पिशुन जैं प्रेमें स्वदंतीं धरी ॥
तैं राहे जरि इंद्र सन्निध तरि होईन तो शंकिता ।
नीचा स्वीकृतवस्तुची नच कदा ये मानसीं फल्गुना[2] ॥९॥

( शार्दूलवि० )

स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं तेथूनियां भूधरीं ।
प्रावाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदीसे बरी ॥
गेली तेथुनि अर्णवाप्रति मदें ते वंद्यही कष्टली ।
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी नेमिली १०

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

*वन्हीतें जल, छत्र सूर्य किरणा, हस्तीस तीक्ष्णांकुश ।
दण्डें गर्दभ धेनु जाति विविधा, शास्त्रोक्त मंत्रें विष ॥
नाना औषधि सेवनें त्वरित ये व्याधी निवारावया ।
मूर्खावीन मिळे पहा अगदतें सर्वांस शास्त्रात या ॥ ११ ॥

( वसंतति० )

साहित्य शास्त्र मधुगान-कला विहीन ।
साक्षात्पशू गमनि पुच्छ विषाण[3] हीन ॥
खाती न हे तृण सजीव परी रहाती ।
भाग्यासि ये पशुचिये नच जाण मीती ॥ १२ ॥

* १ कुत्रें. २ कमीपणा. ३ शृंग. ३ औषध.

( इन्द्रवज्रा )

* ज्यांना न विद्या तप-गंध दान ।
ना धर्म सत्‌शील गुणादि ज्ञान ॥
ये लोकिं ते केवळ भार भूत ।
मानूष रूपें पशुसाच होत ॥ १३ ॥

( द्रुतवि० )

वनचरांसह शैल-वनांतरें ।
निजसुखें फिरणें तरि तें बरें ॥
जरि घडे सहवासचि पामरीं ।
तरि जळो असणें सुरमंदिरीं ॥ १४ ॥

( शार्दूलवि० )

* शास्त्रालंकरणी विभूषित गिरा, जी छात्र वृंदाकरी ।
शास्त्रें ज्ञात असे कवि असतिबा निर्द्रव्य देशीं जरीं ॥
भूपाचें तरि मौर्ख्य तें, कवि असे श्रीमंत वित्ता विना ।
मोलें सांगत कुत्स्य रत्नहि कमी, त्यातें नये कल्पना ॥ १५ ॥

( शिखरिणी )

न चोराला लाधे प्रकट न दिसे दे सुख सदा ।
दुणावे कीं देतां किमपि न सरे लेशहि कदा ॥
न कल्पांतीं पावे निधन[1] धन विद्याभिधें[2] असें ।
असे ज्याचें त्याशीं प्रतिभिडति[3] जे पामर पिसे ॥ १६ ॥

( शालिनी )

जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा ।
संपत्तीचा त्यापुढें काय तोरा ॥

---

१नाश. २विद्यानांव आहे ज्याचें. ३भांडतात, स्पर्धा करितात.

पद्माचा जो तंतु तो वारणाला ।
वारायाला पैं ह्मणे सिद्ध झाला ।। १७ ।।

( इंद्रवज्रा )

अदृष्ट[1] झालें प्रतिकूळ जेंव्हां ।
वारील तें पद्मविहार[2] तेंव्हां ।।
जे क्षीरनीरादि[3] विवेक नाना ।।
त्या हंसकीर्तीस हरूं शकेना ।। १८ ।।

( वसंतति० )

सद्रत्न हार मणि ताइत बाहुदंडीं ।
कीं स्नान चंदन फुलें अणि कांत शेंडी ।।
यांनीं खरी घडतसे पुरुषा न शोभा ।
वाणी च भूषण सुशिक्षितशब्दगर्भा ।। १९ ।।

( शा० वि० )

विद्या हें पुरुषास रूप बरवें कीं झांकलें द्रव्यही ।
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा जे मान्य मान्यांसही ।
विद्या बंधु असे विदेशगमनीं विद्या महा देवता ।
विद्या पूज्य नृपास हा नरपशू ती वेगळा तत्त्वतां ।। २० ।।

( भुजंगप्रयात )

※ परीपूर्ण ऐशी क्षमा अंगिं नांदे ।
तयाधीक क्षांतीगिरा काय तें दे ।।
गमे शुद्र वैरी जयीं क्रोध येतो ।
नदे ताप वन्ही जसा शत्रु देतो ।। १ ।।

---

१ दैव. २ कमळांत क्रीडाकरणें. ३ दूध व पाणी ह्यांचें पृथक्करण वगैरे.

( वसंततिलका )

* दिव्यौषधें विफल मित्र जरी जिवाचा ।
नासर्षदुःखद, समागम दुर्जनाचा ॥
विद्याचिवैभव, त्रपा नव भूषणें तीं ॥
राज्याधिका सुखद रम्य सुकाव्य रीती ॥ २१ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

आप्ताची बहु भीड सेवकजनीं कारुण्य विद्वज्जनीं ।
निष्कापट्य शठत्व दुर्जनजनीं संतोष कीं सज्जनीं ॥
डंका शत्रुजनीं क्षमा गुरुजनीं नारीजनीं धूर्तता ।
ज्यांची हे स्थिति ज्यापरीस असती ते शाहणे तत्वतां २२

( पृथ्वी )

खरें वचन बोलवी जडपणास कीं मालवी ।
महोन्नतीस डोलवी दुरितं[1] मारुनी चालवी ॥
मनीं सुख अमोल वीं[2] यश जगत्रयीं कालवी ।
अनेक गुण पाळवी सुजनसंगती झूलवी[3] ॥ २३ ॥

( भुजंगप्र० )

जयांचें[4] असे पुण्य कीं सावकाश ।
विशेषें जनीं शोभती ते कवीश ॥
जयांचा यशोदेह आकल्प राहे ।
जरामृत्युवार्ता जयांला न साहे ॥ २४ ॥

( उपजाति. )

आली जरी कष्टदशा अपार ।
न टाकिती धैर्य तथापि थोर ॥
केली जरी जोत बळेंच खालें ।

१ पातक. २ विते. ३ देते. ४ मोह पाडिते.

पद्माचा जो तंतु तो वारणाला ।
वारायाला पैं ह्मणे सिद्ध झाला ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा )

अदृष्ट[1] झालें प्रतिकूळ जेव्हां ।
वारील तैं पद्मविहार[2] तेव्हां ॥
जे क्षीरनीरादि[3] विवेक नाना ॥
त्या हंसकीर्तीस हरूं शकेना ॥ १८ ॥

( वसंतति० )

सद्रत्न हार मणि ताइत बाहुदंडीं ।
कीं स्नान चंदन फुलें अणि लांब शेंडी ॥
यांनीं खरी घडतसे पुरुषा न शोभा ।
वाणी च भूषण सुशिक्षितशब्दगर्भा ॥ १९ ॥

( शा० वि० )

विद्या हें पुरुषास रूप बरवें कीं झांकलें द्रव्यही ।
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा जे मान्य मान्यांसही ।
विद्या बंधु असे विदेशगमनीं विद्या महा देवता ।
विद्या पूज्य नृपास हा नरपशू ती वेगळा तत्त्वतां ॥ २० ॥

( भुजंगप्रयात )

※ परीपूर्ण ऐशी क्षमा अंगिं नांदे ।
तयाधीक क्षांतीगिरा काय तें दे ॥
गमे शुद्र वैरी जयीं क्रोध येतो ।
नदे ताप वन्ही जसा शत्रु देतो ॥ १ ॥

---

१ दैव. २ कमळांत क्रीडाकरणें. ३ दूध व पाणी ह्यांचें पृथक्करण वगैरे.

( वसंततिलका )

* दिव्यौषधें विफल मित्र जरी जिवाचा ।
नासर्पदुःखद, समागम दुर्जनाचा ॥
विद्याचिवैभव, त्रपा नव भूषणें तीं ॥
राज्याधिका सुखद रम्य सुकाव्य रीती ॥ २१ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

आप्ताची बहु भीड सेवकजनीं कारुण्य विद्वज्जनीं ।
निष्कापट्य शठत्व दुर्जनजनीं संतोष कीं सज्जनीं ॥
डंका शत्रुजनीं क्षमा गुरुजनीं नारीजनीं धूर्तता ।
ज्यांची हे स्थिति ज्यापरीस असती ते शाहणे तत्वतां २२

( पृथ्वी )

खरें वचन बोलवी जडपणास कीं मालवी ।
महोन्नतीस डोलवी दुरित[१] मारुनी चालवी ॥
मनीं सुख अमोल वी[२] यश जगत्रयीं कालवी ।
अनेक गुण पालवी[३] सुजनसंगती झूलवी[४] ॥ २३ ॥

( भुजंगप्र० )

जयांचे असे पुण्य कीं सावकाश ।
विशेषें जनीं शोभती ते कवीश ॥
जयांचा यशोदेह आकल्प राहे ।
जरामृत्युवार्ता जयांला न साहे ॥ २४ ॥

( उपजाति. )

आली जरी कष्टदशा अपार ।
न टाकिती धैर्य तथापि थोर ॥
केली जरी जोत बळेंच खालें ।

---

१ पातक. २ विते. ३ देते. ४ मोह पाडिते.

ज्वाळा तरी ते वरती उफाळे ॥ २५ ॥

( उपजाति )

वाणी खरी दान बरें अहिंसा[1] ।
नसे परद्रव्यसतीपिपासा[2] ॥
दया अतृष्णा[3] नतिर्भाव[4] जो कां ॥
सन्मार्ग हा धोपट सर्वलोकां ॥ २६ ॥

( वसंतति० )

* आरंभिती न खल विघ्न भयेंचि कांहीं ।
येतांचि विघ्न त्यजिमध्यम कार्य पाही ॥
चित्तासि त्रस्तवितरी वरि विघ्न वैरी ।
कार्या न सोडि परि उत्तम कार्य कारी ॥ २७ ॥

( पृथ्वी )

सुनीत पथ सेवणें मलिन कर्म मानेच ना ।
घडो मरण नावडे खलजनांप्रति प्रार्थना ॥
विपत्तिसमयीं वर प्रकटवीच ना दीनता ।
भल्यांविण असेंअसिव्रत करूं शके कोणता ॥ २८ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्द्धकें ।
आली कष्टदशा घडो मरणही कीं तेज गेलें निकें ॥
ऐसाही मृगराज[6] जीर्ण तृण तो भक्षील कीं काय हा ।
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक शुभग्रासींच ज्याला स्पृहा[7] २९

( मालिनी )

मलिन रुधिरमांसावेगळें हाड दैवें ।

---

१ वध न करणें २ दुसऱ्याचें द्रव्य व स्त्री ह्यांविषयीं लोभ ३ निरिच्छपणा ४ नम्रपा. ५ सर्व ६ सिंह ७ इच्छा.

अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे ॥
क्षुधितहि गजहंता जंबुकातें न मारी ।
अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी ॥ ३० ॥

श्लोक ( वसंततिलका )

तें श्वान एक तुकड्यास्तव[1] चांर नाना ।
दावी धन्यास जठरार्थ कसे पहाना ॥
दे आळवूनि जरि हस्तिप[2] बापभाई[3] ।
घेतोच घांस गजराज कशी बढाई ॥ ३१ ॥

द्रुतवि०

उपजणें मरणें न चुके नरा ।
फिरत नित्य असे भवभोंवरा ॥
उपजला तरि तोचि मला गमे ।
कुलसमुन्नति ज्यास्तव घे रमे ॥ ३२ ॥

( उपजाति )

पुष्पापरी दोंपरिचीच साची ।
हे वृत्ति संभावित जे तयांची ॥
लोकांचिये एक शिरीं वसावें ।
वनींच कीं एक सुकोनि जावें ॥ ३३ ॥

( मालिनी )

शनि-बुध-कुंज[4]-देवाचार्य[5]-शुक्रादिकांतें ।
असमबळ ह्मणोनी राहु टाकी तयांतें ॥
अशिरहि जरि झाला ग्रासितो सूर्यचंद्रा ।
ह्मणउनि पुरुषार्थी तो न सोडी स्वमुद्रा ॥ ३४ ॥

---

१ चाळे २ महात ३ बापा भाई अशा शब्दांनीं. ४ मंगळ ५ देवगुरु—बृहस्पति.

( इन्द्रवज्रा )

वाहे महीतें स्वशिरीं फणीश तो ।
तयास पाठीवरि कूर्म वाहतो ।
समुद्र वे त्यासहि मांडियेवरी ।
थोरांचि हे थोरिव जाण यापरी ॥ ३५ ॥

श्लोक ( शिखरिणी )

मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा ।
प्रहारें वज्राच्या करुनि धरणीं इंगळसडा[1] ॥
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक फिरणें ।
नव्हे त्या मैनाका[2] उचित जलधीमाजि वसणें ॥ ३६ ॥

( वसंतति० )

क्रोधें जळे मणि अचेतन सूर्यकांत ।
ज्यां लागतांच दिननायकपादवात[3] ।
संभावितांत गणना पहिली जयाची ॥
साहेल तो पण कशी शठता[4] दुज्याची ॥ ३७ ॥

( शालिनी )

सिंहाचा जो बाळ तोही चपेटा ।
मारी त्याला जो करी मत्त मोठा ॥
तेजस्वी जे वृत्ति ऐशीच त्यांची ।
तेथें नाहीं चाड कांहीं वयाची ॥ ३८ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

राहो जाति रसातळीं[5] सुगुण हे राहोत ती खाळतें ।

---

१ निखाऱ्यांचें सारवण २ हिमालयास मैनाक ह्मणून एक पुत्र आहे. तो पक्ष वांचविण्या करितां समुद्रांत लपला होता. ३ सूर्याच्या चरणांचा स्पर्श ४ लबाडी. ५ पृथ्वीच्या तळाला.

शैलाग्राहुनि शील सत्वर पडो सौजन्य अग्नींत तें ॥
शूरत्वावरि आदळो अशनिका हें सर्वही नावडे ।
अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें नापुडें ॥ ३९ ॥

( वसंत ति० )

* कर्मेंद्रियें सकलही असतात तींच ।
बुद्धी अंकुठित तशीच वचें हिसाच ॥
बा तोच मानव परी धनहीनता कीं ।
अन्य क्षणी करिविचित्र दशा विलोकीं ॥ ४० ॥

( वंशस्थ )

असे जयाला धन तोचि पंडित ।
कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत ॥
तो मान्य तो सुंदर तो विचक्षण ।
धनाश्रयें राहति सर्वही गुण ॥ ४१ ॥

श्लोक ( शार्दूल वि० )

दुर्मंत्रें नृप संगतिस्तव यती कीं पुत्रही लालनें ।
वेदानध्ययनें द्विजातिकुल दुष्पुत्रें खलाराधनें ॥
नासे शील न पाहतां कृषि मदें या लाज मद्यें फुका ।
शाठ्यें मित्रपणा प्रवासगमनें स्नेह प्रमादें रुका ॥ ४२ ॥

( वसंतति० )

द्रव्यासहे गमनमार्ग यथावकाश ।
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश ॥
जो येथ दान आणि भोग करी न देहीं ।
त्याच्या धनासि मग केवल नाश पाहीं ॥ ४३ ॥

---

१ वज्रा २ द्रव्यसंपादन. ३ वेद पाठ न केल्यानें ४ ब्राह्मणकुल ५ दुष्टाच्या आराधनानें ६ लबाडीनें ७ पैसा. ८ मनुष्य.

( इन्द्रवज्रा )

वाहे महीतें स्वशिरीं फणीश तो ।
तयास पाठीवरि कूर्म वाहतो ।
समुद्र घे त्यासहि मांडियेवरी ।
थोरांचि हे थोरिव जाण यापरी ॥ ३५ ॥

श्लोक ( शिखरिणी )

मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा ।
प्रहारें वज्राच्या करुनि धरणीं इंगळसडा[1] ॥
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक फिरणें ।
नव्हे त्या मैनाका[2] उचित जळधीमाजि वसणें ॥ ३६ ॥

( वसंतति० )

क्रोधें जळे मणि अचेतन सूर्यकांत ।
ज्या लागतांच दिननायकपादवात[3] ।
संभावितांत गणना पहिली जयाची ॥
साहेल तो पण कशी शठता[4] दुज्याची ॥ ३७ ॥

( शालिनी )

सिंहाचा जो बाळ तोही चपेटा ।
मारी त्याला जो करी मत्त मोठा ॥
तेजस्वी जे वृत्ति ऐशीच त्यांची ।
तेथें नाहीं चाड कांहीं वयाची ॥ ३८ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

राहो जाति रसातळीं[5] सुगुण हे राहोत ती खालतें ।

---

१ निखाऱ्यांचें सारवण २ हिमालयास मैनाक ह्मणून एक पुत्र आहे. तो पक्ष वांचविण्या करितां समुद्रांत लपला होता. ३ सूर्याच्या चरणांचा स्पर्श ४ लबाडी. ५ पृथ्वीच्या तळाला.

शैलाग्राहुनि शील सत्वर पडो सौजन्य अग्नींत तें ॥
शूरत्वावारि आदळो अशनिका हें सर्वही नावडे ।
अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें नापुडें ॥ ३९ ॥

( वसंत ति० )

* कर्मेंद्रियें सकलही असतात तींच ।
बुद्धी अंकुठित तशींच वचें हिसाच ॥
बा तोच मानव परी धनहीनता कीं ।
अन्य क्षणी करिविचित्र दशा विलोकीं ॥ ४० ॥

( वंशस्थ )

असे जयाला धन तोचि पंडित ।
कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत ॥
तो मान्य तो सुंदर तो विचक्षण ।
धनाश्रयें राहति सर्वही गुण ॥ ४१ ॥

श्लोक ( शार्दूल वि० )

दुर्मंत्रें नृप संगतिस्तव यती कीं पुत्रही लालनें ।
वेदानध्ययनें द्विजातिकुल दुष्पुत्रें खलाराधनें ॥
नासे शील न पाहतां कृषि मदें या लाज मद्यें फुका ।
शाठ्यें मित्रपणा प्रवासगमनें स्नेह प्रमादें रुका ॥ ४२ ॥

( वसंतति० )

द्रव्यासहे गमनमार्ग यथावकाश ।
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश ॥
जो येथ दान आणि भोग करी न देहीं ।
त्याच्या धनासि मग केवल नाश पाहीं ॥ ४३ ॥

---

१ वज्रा २ द्रव्यसंपादन. ३ वेद पाठ न केल्यानें ४ ब्राह्मणकुल ५ दुष्टाच्या आराधनानें ६ लबाडीनें ७ पैसा. ८ मनुष्य.

श्लो० ( शार्दूलवि० )

शाणोल्लेख[1] जया असा मणि रणीं जो वीर घायाळला ।
संभोगें शिणली अशी नव वधू हस्ती न मस्तावला ॥
ज्यांचीं स्वच्छ शरद्दतूंत पुलिनें[2] त्या निम्नगा[3] चंद्रही ।
बीजेचा[4] प्रभु पात्रदत्तधन जो हे शोभती सर्वही ॥ ४४ ॥

( द्रुतवि० )

दुबलिकेंत[5] पसा[6] यव[7] इच्छितो ।
प्रभुपणीं धरणी तृण मानितो ॥
ह्मणुनियां कृपणत्व उदारता ।
घडतसे समयोचित तत्त्वतां ॥ ४५ ॥

( भुजंगप्रयात )

प्रजा हाच की वत्स भूधेनुकेचा ।
नृपा तूं करीं फार सांभाळ याचा ॥
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें[8] ।
अभिष्टार्थ[9] देईल हे भूमि वेगें ॥ ४६ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

केव्हां सत्य वदे वदे अनृतही केव्हां वदे गोडही ।
केव्हां अप्रियही दयाळुहि असे केव्हां करी घातही ॥
जोडी अर्थहि[10] जे यथेष्ट समयीं कीं वेचे[11] ही आदरी ।
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे[12] परी ॥ ४७ ॥

( शालिनी )

* आज्ञा कीर्ती विप्र मित्राऽवनांचें[13] ।

---

१ साहाणेवर घांसणें. २ वाळवंटें. ३ नद्या ४ द्वितीयेचा ५ गरिबींत ६ पसाभर ७ जव-एकधान्य ८ प्रीतीमुळें ९ इष्टफळ. १० पैसा ११ खर्च १२ वैश्याप्रमाणें. १३ अवन रक्षण.

दान क्रीया भोग या षड्गुणाचें ॥
नाहीं अंगीं ज्ञान वास्तव्य ज्याचें ।
पार्थीवा श्रीतत्त्व हें व्यर्थ त्याचें ॥ ४८ ॥

( शा०वि० )

ब्रह्मचानें लिहिलें ललाटफलकीं जें द्रव्य ज्याला जसें ।
तें लाधे मरु[1]मंडळीं अधिकता मेरू[2]स गेल्या नसे ॥
सेवीं धैर्य धनाढ्य त्यांप्रति वृथा दावूं नको दीनता ।
कूपीं कीं जळधींत कुंभ जळ घे माईल तें तत्त्वतां ॥ ४९ ॥

( भुजंगप्र० )

* नसे ठाउकें कोणत्या मानवातें ।
तुझें अंबुदा चातकाऽधार नातें ॥
कसा पाहसी वाट बा मेघराया ।
किती लाविशी दीन दाचा वदाया ॥ ५० ॥

( शिखरिणी )

*सख्या सारंगारे स्ववच परिसे सावधपणें ।
नभीं नाना अभ्रें दिसती परितीं भिन्न स्वगुणें ॥
वृथा गर्जे कोणी, कवण करि भू आर्द्र पतनें ।
पहासी त्या सर्वा विनवि न वृथा दीन वदनें । ५१ ।

( भुजंगप्रयात )

फुका कोरडें वैर कीं निर्दयत्व ।
परस्त्री परद्रव्य हें मुख्य सत्व ॥
अनिष्टत्व चिंती सुहृद्बांधवाचें[6] ।

---

१ कपाळीं २ निर्जल प्रदेशांत ३ सुवर्णाच्या पर्वतावर ५ अबुद् –मेघ ६ इष्टमित्र व आप्त यांचें.

स्वतःसिद्ध हें रूप पैं दुर्जनांचें ॥ ९२ ॥

( वसंतति० )

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा ।
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा ॥
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं[1] ।
तो सर्प काय न चढे खल अंतरंगीं ॥ ९३ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

लज्जेनें जड दांभिक व्रतिपणें[2] कापट्य शौचें[3] गणी ।
शौर्यें निर्दय आर्जवें लडबड्या कीं दीन सद्भाषणीं ॥
मानेच्छा तरि मूर्ख कीं बडबड्या वक्ता निकामी भला ।
ऐसा तो गुण कोणता खलजनीं नाहींच जो निंदिला ९४

श्लोक ( शार्दूल विक्रिडीत. )

तें कां दुर्गुण लोभ जें पिशुनता[4] जें कां महापातकें ।
काशाला तप सत्य जें मन शुचें जें कां सुतीर्थोदकें ॥
काशाला जन जें भलेपण असे कां भूषणें कीर्ति जें ।
सद्विद्या जरि कां धनें मरण कां दुष्कीर्ति लोकींच जें ॥ ९५ ॥

( शार्दूलवि० )

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें ये कामिनीला जरा[5] ।
पद्मावीण जलें निरक्षमुखीं जो नेटका गोजिरा ॥
दात्याला धनलोभ नित्य वसतें दारिद्य विद्वज्जनीं ।
दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं हीं सात शल्यें[6] मनीं । ९६ ।

---

१ मस्तकीं २ व्रतस्थ असल्यानें ३ स्वच्छपणानें ४ लबाडी
५ ज्ञातारपण ६ कांटे.

( उपेंद्रव० )

झणीं विसंबाल महीपतीला ।
स्वकीय कोणीच नसे तयाला ॥
अध्वर्यु[1] हो कीं यजमान त्यातें ।
हुताश[2] जाळी धरितांच हातें ॥ ५७ ॥

( शार्दूलवि० )

मौनें मूक दिसे वदे तरि महावाचाल पार्श्वीं[3] फिरे ।
तेव्हां धीट तसा विवेकच नसे जैं चालतां अंतरें ॥
क्षांतीनें[4] तरि भ्याड शांति न धरी तैं गांवडा यापरी ।
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं॥ ५८ ॥

श्लोक ( वसंतति० )

ज्या आवडेत खळ आपणही तसाच ।
दुर्वृत्त[5] फार निरपत्रप[6] दुष्ट नीच ॥
झालें तयासि जरि वैभव दैवयोगें ।
नांदे तयास्तव सुखें मग कोण सांगे ॥ ५९ ॥

( शालिनी )

आरंभीं जे फार शेवीं न कांहीं ।
आधीं थोडी जे क्रमें फार पाहीं ॥
छाया पूर्वार्धी[7] परार्धी[8] दिनाची ।
तैशी मैत्री दुर्जनांची भल्यांची ॥ ६० ॥

( उपजाती )

तृणें मृगाला सलिलें[9] झषाला ।

---

१ उपाध्याय २ अग्नि ३ बाजूस ४ क्षमेनें ५ दुराचारी ६ निर्लज्ज ७ पहिली अर्धी ( सूर्योदयापासून माध्यानापर्यंत ) ८ दुसरी अर्धी ( दोनप्रहरांनंतर सायंकालपर्यंत ) ९ उदकानें.

स्वतःसिद्ध हें रूप पैं दुर्जनांचें ॥ ९२ ॥

( वसंतति० )

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा ।
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा ॥
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं[1] ।
तो सर्प काय न चढे खल अंतरंगीं ॥ ९३ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

लज्जेनें जड दांभिक व्रतिपणें[2] कापट्य शौचें[3] गणी ।
शौर्यें निर्दय आर्जवें लडबड्या कीं दीन सद्भाषणीं ॥
मानेच्छा तरि मूर्ख कीं बडबड्या[4] वक्ता निकामी भला ।
ऐसा तो गुण कोणता खलजनीं नाहींच जो निंदिला ९४

श्लोक ( शार्दूल विक्रिडीत. )

तें कां दुर्गुण लोभ जैं पिशुनता जैं कां महापातकें ।
काशाला तप सत्य जैं मन शुचें जैं कां सुतीर्थोदकें ॥
काशाला जन जैं भलेपण असे कां भूषणें कीर्ति जैं ।
सद्विद्या जरि कां धनें मरण कां दुष्कीर्ति लोकींच जैं ॥ ९५ ॥

( शार्दूलवि० )

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें ये कामिनीला जरा ।
पद्मावीण जळें निरक्षमुखीं जो नेटका गोजिरा ॥
दात्याला धनलोभ नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं[5] ।
दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं हीं सात शल्यें[6] मनीं । ९६ ।

---

१ मस्तकीं २ व्रतस्थ असलयानें ३ स्वच्छपणानें ४ लबाडी ५ ज्ञातारपण ६ कांटे.

( उपेंद्रव० )

झणीं विसंबाल महीपतीला ।
स्वकीय कोणीच नसे तयाला ॥
अध्वर्यु[1] हो कीं यजमान त्यातें ।
हुताश[2] जाळी धरितांच हातें ॥ ५७ ॥

( शार्दूलवि० )

मौनें मूक दिसे वदे तरि महावाचाळ पार्श्वीं[3] फिरे ।
तेव्हां धीट तसा विवेकच नसे जैं चालतां अंतरें ॥
क्षांतीनें[4] तरि भ्याड शांति न धरी तैं गांवढा यापरी ।
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं। ५८ ।

श्लोक ( वसंतति० )

ज्या आवडेत खळ आपणही तसाच ।
दुर्वृत्त[5] फार निर्[6]पत्रप दुष्ट नीच ॥
आलें तयासि जरि वैभव दैवयोगें ।
नांदे तयास्तव सुखें मग कोण सांगे ॥ ५९ ॥

( शालिनी )

आरंभीं जे फार शेवीं न कांहीं ।
आधीं थोडी जे क्रमें फार पाहीं ॥
छाया पूर्वार्धी[7] परार्धी[8] दिनाची ।
तैशी मैत्री दुर्जनांची भल्यांची ॥ ६० ॥

( उपजाती )

तृणें मृगाला सलिलें[9] झषाला ।

---

१ उपाध्याय २ अग्नि ३ बाजूस ४ क्षमेनें ५ दुराचारी ६ निर्लज्ज ७ पहिली अर्धी ( सूर्योदयापासून माध्यानापर्यंत ) ८ दुसरी अर्धी ( दोनप्रहरानंतर सायंकालपर्यंत ) ९ उदकानें.

संतोष हे वृत्ति[1] महाजनाला ॥
तयास निष्कारण सिद्ध वैरी ।
किरात[2] कैवर्तक[3] दुष्ट भारी ॥ ६१ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

वांछा सज्जनसंगमीं गुरुकुलीं वंदारुता[4] नम्रता ।
निंदेचें भय तुष्टता परगुणीं स्वस्त्रीमुखीं लुब्धता[5] ॥
विद्याभ्यास महेशभक्ति खलसंसर्गी[6] अनासक्तता ।
चित्ताचा जय या गुणांस निधि[7] जे त्यां वंदिजे तत्वतां ।६२।

श्लोक ( शिखरिणी )

विपत्काळीं[8] धैर्य प्रभुपणि सहिष्णुत्व[9] बरवें ।
सभे पांडित्याचा प्रसर[10] समरीं शौर्य मिरवे ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर[11] रति[12] विद्याव्यसन[13] जें ।
तयांचे हे स्वाभाविक गुण सद्दा सत्पुरुष जे ॥ ६३ ॥

( वसंतति० )

दे दान गुप्त उपकार करी न बोले ।
मानी प्रमोद[14] जरि मान्य घरास आले ॥
दावी न गर्व विभवें गुण घे पराचे ।
खड्गाग्रतुल्य[15] विषम व्रत हें भल्याचें ॥ ६४ ॥

( शि० रि० )

करीं साजे त्याग[16] श्रवणयुगळीं[17] सच्छ्रवण जें ।

---

१ उपजीविका २ पारधी ३ धीवर कोळी ४ समान ५ आवड ६ दुष्टांच्या संगतीविषयीं ७ सांठवण ८ दरिद्रावस्थेंत ९ सहनशीलता १० प्रवाह ११ पुष्कळ १२ प्रीति १३ विद्येचा छंद १४ आनंद १५ तरवारीच्या धारेसारखें १६ दान १७ दोन कानांत.

मुखीं सत्य स्वेच्छाचरण विलसे शौर्यहि भुजें ॥
स्वशीर्षे थोराला नमन विभवावांचुनि पहा ।
मल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकारविधि हा॥ १५॥

( शालिनी. )

संपत्काळीं मार्दवें सज्जनांचीं।
होती चित्तें जाति पंकेरुहाचीं ।
आपत्काळीं शैलही आदळो कां ।
धाकेना जो गाजवी धैर्यडंका ॥ १६ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

तोयाचे पारि नांवही न उरतें संतप्त लोहावरी ।
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ॥
तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें ।
जाणा उत्तममध्यमाधमदशा संसर्ग योगें टिके॥ १७॥

( वसंततिलका )

जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच ।
जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच ॥
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी तो ।
हा लाभ पूर्वसुकृताविण केविं होतो ॥१८ ॥

( मदिरा )

नम्रपणेंच सभेंत महोन्नत ते गुण वर्णुनियां अपराचे । सांगितल्याविण दाविवि कौशल सर्वजणांप्रति जे स्वगुणांचें । स्वार्थ परार्थ हि साधिति जिंतितिशांतिबळें मुखरत्व खळाचें । संत महाद्भुतभाजन यापरि सेवन कोण करी न तयांचें ॥ १९ ॥

( स्वागता )

वृक्ष फार लवती फळभारें ।
लोंबती जलद घेउनि नीरें ।
थोर गर्व न धरी विभवाचा ।
हा स्वभाव उपकारपरांचा ॥ ७० ॥

( उपजाती )

श्रुतेंचि कीं श्रोत्र न कुंडलानें ।
दानेंचि किं पाणि न कंकणानें ॥
साजे तसा देहहि हा न आनें ।
परोपकारेंचि न चंदनानें ॥ ७१ ॥

( वसंतति० )

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्म ।
वर्णी नरेच गुण झांकुनियां कुकर्म ।
दे आपणांस असतां व्यसनीं त्यजीना ।
सन्मित्रलक्षण असें वदताति जाणा ॥ ७२ ॥

( वसंतति० )

पद्में प्रफुल्ल करितो सविता स्वयें हा ।
रात्रीं विकास कुमदांप्रति चंद्र दे हा ॥
अप्रार्थितां जलद दे जळ या जनाला ।
मुक्तार्थ कीं परहितोत्सव सज्जनाला ॥ ७३ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

हे तों सत्पुरुष स्वकार्य त्यजिती अन्यार्थ संपादिती ।
हे तों मध्यम जे निजार्थ करिती अन्यार्थ ही साधिती ॥
हे तों राक्षस जे स्वकार्यविषयीं अन्यार्थविध्वंसिती ।
जे कां व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण कीं दुर्मति ७४

श्लो० ( शार्दूलवि० )

क्षीरानें दिधलें स्वकीय गुणही नीरास आत्माश्रयें ।
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ॥
झाला ताप विशिष्ट अग्निवदनीं तें दुग्ध जेव्हां पडे ।
तेव्हां धाउनि तोय शीतल करी मित्रत्व हें चोखडें ७५

( वसंतति० )

एकत्र केशव वसे अपरत्र वैरी ॥
अन्यत्र पर्वत शतक्रतुभीत भारी ॥
कीं वडवाग्नि इतरत्र असे उदार ॥
पाहें कसें पण सरित्पतिचें शरीर ॥ ७६ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

तृष्णेतें निवटीं क्षमेस जवटीं गर्वादिकांतें पिटीं ॥
सत्यातें उमटीं हृदंबुजपुटीं सेवीं दया गोमटी ॥
विद्वत्स्नेहतुटी नको करुं भले त्यांच्या गुणातें लुटीं ॥
वंशीं कीर्तिनटी उभारिं अरिषड्वर्गासि तूं आपटीं । ७७ ।

( शा० वि० )

ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें वोतलीं ।
कीं जीं हीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं ॥
लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी मानिती ।
चित्तीं तोषहि पावती सुजन ते नेणों किती नांदती ७८

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

अब्धीमाजि बुडो प्रयत्न करुनी हेमाद्रिशृंगीं चढो ।
शत्रूंतें रगडो रणीं क्रयकृषि व्यापारकर्मीं भिडो ॥
विद्या सर्व पढो कडोविकडिच्या व्योमास लंघोउडो ।
जें होणार चुकेचि ना विधिबळें बेटा रडो ना रडो । ७९ ।

( उपजाति )

अमूल्यरत्नीं सुर ते न धाले ॥
हालाहला देखुनिही न भ्याले ॥
सुधेविणें यास्तव जे समर्थ ॥
न निश्चितार्थाविण ते कृतार्थ ॥ ८०

श्लोक ( शिखरिणी )

महीपृष्ठीं केव्हां अवचट पलंगीं पहुडतो ॥
क्षुधेतें शाकान्नें अवचट सदन्नें निववितो ॥
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्रीं मिरवतो ॥
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो ८१

( शा० वि० )

भाग्याला सुजनत्व भूषण असे कीं मौन शौर्यास तें ।
ज्ञानाला शम त्या शमास विनय द्रव्यास दातृत्व तें ॥
अक्रोधत्व तपा क्षमा प्रभुपणा धर्मास निर्दंभता ।
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वतां ८२

( उपजति० )

वानोत निंदोत सुनीतिमंत ।
चळो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीचि घडो युगांतीं ।
सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥ ८३ ॥

श्लो० ( शा० वि० )

पेटीमाजि निरोधिला न सुटका झाली भुकेला फणी ॥
तों केलें बिळ मूषकें अवचिता गेला मुखीं तत्क्षणीं ॥
त्यातें भक्षुनि सर्प तत्कृतपथें निश्चित गेला पहा ।
ऐसें कर्म अतर्क्य यास्तव तुह्मी कीं स्वस्थचित्तें रहा ८४

( उपजाति )

अस्फालितांही स्वकरें न राहे ॥
चेंडू जसा तो उसळोंच पाहे ॥
विपत्तियोगें पडले जरी कां ॥
तैं स्थैर्य नोहे तरि साधुलोकां ॥ ८५

( उपजाति )

आलस्य जें कार्यविघातकारी ।
असों नये तो रिपु या शरीरीं ॥
उद्योग सद्बंधु तया न टाकीं ।
त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं ॥ ८६ ॥

( वसंतति० )

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ।
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ॥
जाणोनि हे सुजन ज्या दुबळीक आली ।
त्याशीं कदा न करितीच भले टवाळी ।

श्लो० ( शा० वि० )

ज्याला नीति वदे बृहस्पति करीं वज्राअशीं आयुधें ।
विष्णूचें बळ शुभ्र वारण तशीं स्वर्गादि नानाविधें ॥
दुर्गें सैनिक देव यद्यपि तरी युद्धीं पळे वृत्रहा ।
धिग्धिक् पौरुष यत्न यास्तव खरें प्रारब्ध मोठें पहा। ८८ ।

( वसंतति० )

कर्मानुसार घडते मति सर्वलोकां ।
कर्माअधीन फळ येथ नसेच शंका ॥
हें सत्य यद्यपि तरी असतां विवेकें ।
होणार हो तरि सुखें निजकर्मपाकें ॥ ८९ ॥

( वसंत ति० )

खल्वाट चंडकिरणें अति तप्त झाला ।
छायार्थ तालतरुमुलसमीप गेला ॥
तत्काळ थोर पडलें फळ तो निमाला ।
जो जेथ दैवहत जाइल तेथ घाला ॥ ९० ॥

( वसंत ति० )

जे बंधनें गजभुजंगविहंगमांला ।
कीं राहु वेध रजनीशदिवाकरांला ॥
दारिद्र्यपीडित जनांवरि फार लोटे ।
हें पाहतां मज अदृष्ट बलिष्ठ वाटे ॥ ९१ ॥

( वसंतति० )

जें पात्र कीं पुरुषरत्न महागुणांचें ।
तें निर्मितो विधिचि भूषण भूमिकेचें ॥
कां त्यासही त्वरित मृत्युमुखांत लोटी ।
त्याची गमे मज अपंडितता करंटी ॥ ९२ ॥

( शा० वि० )

* ठेवा दोष वसंति कां जरिन तीं पर्णें करीरीं नवीं ।
होई अंध उलूक यास्तव कसा दोषार्ह होतो रवी ॥
नाहे हा घनदोष चातक मुखीं पर्जन्य तो नापडे ।
मिथ्या कोण करील ब्रह्म लिखिता त्या अन्वयें हें घडे ।९३

( मदिरा )

आंकित जे विधिचे सुर सर्वहि त्यांस उगा प्रणिपात करावा । प्राक्तन कर्म तसें फळ दे तरितो विधिथोर किमर्थ ह्मणावा । कर्मबळें फळतील फळें तरि कर्मिच भाव कसा

न धरावा । दुर्बळ ते सुर दुर्बळ तो विधि काय तयांस्तव
अर्थ घडावा ॥ ९४

( शिखरिणी )

कुलालव्यापारी कमळभव जेणें करविला ।
दहा घेरे घेरे ह्मणुनि हरिधाकें मरविला ॥
भिकारी ज्या कर्मे करुनि हर लोकीं फिरविला ।
नमावें त्या जेणें रवि परि रिकामा नुरविला ॥९५॥

( वसंतति० )

विद्या सुरूप कुल सेवन शील पाहीं ।
त्यांचे गुणीं किमपि कांचनलब्धि नाहीं ॥
तें पूर्वपुण्य समयींच फळे नराला
काळीं जसें फळ घडे धरणीरुहाला ॥ ९६ ॥

( वंशस्थ )

वनीं रणीं शत्रुजलाग्निसंकटीं ।
महार्णवीं पर्वतवासदुर्घटीं ॥
निजो वसो आणि फिरो अरण्यें !
त्या त्या स्थलीं राक्षिति पूर्वपुण्यें ॥ ९७ ॥

( शा० वि० )

स्थापी दुर्जनता भल्यास बुधजे स्थापी तयां मूर्खता ।
आप्तांमाजि अनाप्तता कुवचनें स्थापी बळें तत्त्वतां ॥
पीयूषासहि कालकूट करिते सेवीं तये चंडिके ।
तेणें पावसि सौख्य साधुपण हें लावील तूतें भिके ।९८।

( उपजाति )

खोटें बरें कार्य असो तयाचा ।

विचारिजे कीं परिणाम साचा ॥
कर्तव्य कीं नें विबुधें विवेकें ।
तें अन्यथा शल्य घडे विपाकें ॥ ९९ ॥

श्लोक ( स्रग्धरा )

[1]श्रीखंडाचींच काष्ठें करुनि शिजवितो पेंडि[2] वैडूर्यपात्रीं[3] ।
किंवा तो अर्क[4]मूलास्तव कनकहलें[5] नांगरीतो धरित्री ।
केळी तोडूनि तो कीं त्वरित चहुंकडे पेरितो कोद्रवां[6]तें ।
जो या येउनि लोकीं सुकृत[7] न करितां आचरे दुष्कृतातें[8] १००

---

१ चंदनाचीं. २ अन्न. ३ वैडूर्य नावाच्या मौल्यवान् रत्नाच्या भांड्यांत. ४ रुईच्या मुळां-साठीं. ५ सुवर्णाच्या नांगरानें ६ हरीक. ७ पुण्य. ८ पाप.

॥ श्री ॥

# भर्तृहरिकृत वैराग्यशतक.

श्लो० ( शार्दूलवि० )

चूडोत्तंसितचारुचन्द्रकलिकाचञ्चच्छिखाभासुरो ।
लीलादग्धविलोलकामशलभः श्रेयोदशाग्रे स्फुरन् ॥
अन्तःस्फूर्जदपारमोहतिमिरप्राग्भारमुच्चाटयन् ।
चेतःसद्मनि योगिनां विजयते ज्ञानप्रदीपो हरः ॥ १ ॥

( शार्दूलवि० )

मौलिस्थान मनोद चंद्रकलिका तत्तुल्य ज्या शुभ्रता ॥
हेला काम पतंग तो झडपतां त्या जाळिलें तत्त्वतां ॥
जो कल्याण दशे पुढें स्फुरतसे मोहांद्ध कारा हरी ॥
तो ज्ञानात्मक शंभुदीप मिरवे योगीश हृन्मंदिरीं ॥ १ ॥

( भुजंगप्रयात )

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें ।
धनाढ्या प्रभू व्यापिलें दुर्मदानें ॥
शिरीं थोर मूर्खास अज्ञान ओझें ।
जिरालें निजांगींच पांडित्य माझें ॥ २ ॥

( शिखरिणी )

न संसाराची हे दिसत चरितें जाण कुशलें ।
विपाकें पुण्याच्या मज विचरितां ज्ञान घडलें ॥

व्यर्थे पुण्याच्या हे विषय विषयी जे जन तयां ।
सुखे देती जाती व्यसन मग देऊनि विलया ॥ ३ ॥

( पृथ्वी )

शिणोनि फिरलों महाविषमदुर्गदेशांतरी ।
तथा प्रभुहि सेविले न फळ लाधलें कीं तरी ॥
सशंक तरि जेविलों परगृहीं जसा कावळा ।
परंतु न दिसे मला कठिण आस हे दुर्बळा ॥ ४ ॥

श्लोक ( शार्दूल विक्रिडीत. )

कांहीं द्रव्य असेल कीं उकरिली म्यां या भ्रमें हे मही ।
राजेही बहुसेविलेचि गिरिचे म्यां जाळिले धातुही ॥
रात्रीं मंत्रजपें श्मशान धरिलें पाथोधि उल्लंघिला ।
झाली प्राप्ति कपर्दिका न मज तों सोडीं दुराशे मला ॥ ५ ॥

( वसंत ति० )

म्यां साहिली खळजनोक्ति कठोर पाहीं ।
पोटांत दुःख वरिचेवरि हांसलों ही ॥
कीं प्रार्थिलें स्वघटरार्थ मदांध लोकां ।
आशे अणीक मज नाचविशी कितीकां ॥ ६ ॥

श्लोक ( शिखरिणी )

दिसे ज्या प्राणांची स्थिति जलजपत्रोदक जसें ।
तयांसाठीं केलें विविध बहु म्यां पातक असें ॥
पुढें द्रव्याढ्यांच्या प्रचुरधनलोभास्तव वृथा ।
विलज्जें म्यां केली बहुतर मृषात्मस्तुतिकथा ॥ ७ ॥

( वंशस्थ )

न भोगिले भोगहि मीच भोगिलों ।

न साधिलें ही तप मीच तापलों ॥
न काळ गेला तरि मीच चाललों ।
न खुंटली आस हि मीच खुंटलों ॥ ८ ॥

तोटक.

वदना रदनावलिनें त्यजिलें ।
शिर सर्व हि शुभ्रपणें पिकलें ॥
उठतां बसतां अणु शक्ति नसे ।
परि आस निरंतर माजतसे ॥ ९ ॥

( उपजाति )

मी हा अहंकार सभोग गेला ।
तुल्यायुषीं स्वर्ग समीप केला ॥
काठीविणें ज्या फिरणेंच नाहीं ।
तथापि धाके मरणासि देही ॥ १० ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

आशा थोर नदी मनोरथ तिचें पानीय वीची तृषा ।
स्त्रीपुत्राद्यनुराग हे जलचरें जे पूर्ण कूलंकषा ॥
संसारभ्रम भोंवरा गरगरी चिंताच जीचीं तटें ।
तीतें जे तरले मुनीप न कधीं ते पावती संकटें ॥ ११ ॥

( उपजाति. )

अवश्य जाणारचि भोग शेखीं ।
कां होतसे यास्तव लोक दुःखी ॥
मुक्तार्थ आसक्तपणें श्रमावें ।
सुखें अनासक्तपणें असावें ॥ १२ ॥

( शालिनी )

जे कां पूर्वी भोगिलीं आणि भोग्यें ।
ज्ञानी ऐशीं टाकिती सर्व भोग्यें ॥
द्रव्याचें तों तोंड कल्पीं दिसेना ।
वांछामात्र त्याग आह्मां घडेना ॥ १३ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

ध्याती ब्रह्म सदैव धन्य नर ते राहूनियां कंदरीं ।
ज्यांचीं बाष्पजळें विहंगम पिती बैसोनि मांडीवरी ॥
एकांतीं स्वमनोरथेंचि रचितों उद्यानवापीगृहें ।
स्त्रीसौख्यादिक आमुचें सरतसे हा हंत आयुष्य हें । १४ ।

( वसंतति० )

भिक्षाटणें अशन तें क्षण एकवार ।
शय्या महीवरि जयास न रांडपोर ।
कंथा जया वसन कीं शतखंड ते ही ।
टाकीच ना तदपि तो विषयांसि देहीं ॥ १५ ॥

श्लोक ( स्रग्धरा )

सोन्याचे कुंभ हे कीं ह्मणवुनि वदती गोठलें मांस त्याला ।
थुंका शेंबुड यांचें वदन सदन त्या चंद्र दृष्टांत केला ॥
दुर्गंधिस्थान मुत्रस्थल जघन तया तुल्य सोंडेस बोले ।
वर्णी या निंद्यरूपा कविवर न कळे यासही काय झालें । १६ ।

( आर्या )

* चर्मांची द्वय खंडें गुदस्थ वायूमुळें विगंधी जीं ।
रमती नर स्थानिं अशा सांगा कीटक नव्हेति ते कां जी १७

( उपजाती )

न जाणतां टोळ पडे हुताशीं ।

नेणोनियां मीन गिळी गळाशीं ॥
अभिज्ञ आह्मी विषयासि जेव्हां ।
सोडूंचना मोह बलिष्ठ तेव्हां ॥ १८ ॥

( शा०वि० )

मोठें मंदिर पुत्र पंडित बरे संपत्तिही फारशी ।
भार्याहे गुणशालिनी वय नवें मूढासि माया अशी ॥
मानी शाश्वत विश्व हें पडतसे संसार कारागृहीं ।
ज्ञानी नश्वर दृश्य मानुनि मनीं संन्यास घे सत्वरीं १९

( वसंतति० )

पोरें सदैव रडती क्षुधितें कृशांगें ।
स्त्री वस्त्र जर्जरित नेसुनि दीन वागे ।
पाहोनि दुःख घरिचें जठरार्थ कैसें ।
देहीति गद्गदरवें वदिजे प्रयासें ॥ २० ॥

( मालिनी )

अभिमतजनमानग्रंथिकेतें हरीतें ।
गुणकमळ तयाला कौमुदीप्राय होते ॥
अतिविपुळमुळज्जावल्लिकेची कुठारी ।
जठरपिठरिका हे दुर्दशेतें न भारी ॥ २१ ॥

( शार्दूलवि० )

जेथें श्रोत्रिय पुण्यशील वसती सद्विप्र गंगातटीं ।
त्या ग्रामीं अथवा वनीं निजसुखें राहोनि निःसंकटीं ॥
हातीं खर्पर घेउनी मधुकरी मागोनि जो भक्षितो ।
लोकीं तोच सुखी तदानन जळो जो दीनता भोगितो ॥ २२ ॥

( शार्दूल वि० )

गंगेनें स्वतरंगसुंदरकणीं जीं भोंवतीं शिंपिलीं ।

जीं कां चारुशिलातलीं बसुनियां विद्याधरीं सेविलीं ॥
स्थानें काय हिमाद्रिचीं क्षयदशा तीं सर्वही पावलीं ।
जीं पोटें अपमानपूर्वक नरीं अन्यालयीं पोशिलीं २३

( वसंतति० )

ते कंद काय अवघेचि जळोनि गेले ।
किंवा प्रवाह नदिचे अतिशुष्क झाले ॥
कीं वाण आजि विपिनीं तरुवल्कलांची ।
कां पाहताति वदनें न कळे खलांचीं ॥ २४ ॥

( इंद्रवज्रावृत्त )

नेसूं तृणें कंदफळेंचि खाऊं ।
शय्या मही चाल वनासि जाऊं ॥
तेथें पहा क्षुद्रधनेश्वरांची ।
वार्ता न कानीं पडणार साची ॥ २५ ॥

( उपजाति )

फळें श्रमावांचुनि भूरुहांचीं ।
पदोंपदीं शीत जळें नदीचीं ॥
असोनियां कोमलपत्रशय्या ।
द्वारीं प्रभूच्या श्रमताति वायां ॥ २६ ॥

( शा० वि० )

होती वासर दीर्घ जे धनपति द्वारीं तयां प्रार्थितां ।
नानासौख्यभरें क्षणोपम मला जे लोटले नेणतां ॥
निःसंगत्वपणें धरूनि बसलों हे पर्वताचे गुहा ।
आतां त्या दिवसांसि हांसत असें ध्यानावसानीं पहा ॥२७

( शा० वि० )

दैन्याला घसरी सुखास पसरी भ्रांतीस जे संहरी ।

मात्सर्यास करी पराङ्मुख बरी दे लात चिंताशिरीं ॥
झोळी शीघ्र भरी सुपावन करी तोषास दे अंतरीं ।
शंभूची निज सोइरी मधुकरी ते सेव्य योगीश्वरीं ॥ २८ ॥

( शार्दूलवि० )

*भोगा रोग, कुळाप्रती पतन तें, पार्थीव वित्ताप्रती ।
माना निर्धनता, बळा रिपु, तशी रूपा जरा भीति ती ॥
शास्त्राला भय वाद, काळ भय तें देहा प्रती जाचतें ।
सच्छीला खळ भीति, निर्भय असे वैराग्यची एक तें ॥ २९ ॥

श्लोक ( शार्दूलवि० )

मृत्यूनें जननास वार्द्धकपणें कीं यौवना रोखिलें ।
लोभें आक्रमिली स्वतुष्टि वनितामोहें शमा व्यापिलें ॥
मात्सर्यें सुगुणा वना फणिकुलें पृथ्वीपतीला खलें ।
अस्थैर्यें विभवास सांग कवणें कोणास न ग्रासिलें ॥ ३० ॥

( शालिनीवृत्त )

आरोग्यातें ग्रासिलें सर्वरोगें ।
लक्ष्मीतें ते धांवती क्लेश वेगें ॥
होतां प्राणी पाठिशीं मृत्यु लागे ।
देवें केलें कोणतें स्वस्थ सांगें ॥ ३१ ॥

( वसंततिलका )

*भोग क्षणीक जणु तुंग तरंग भंग ।
आहे तसाचि असु यौवन सौख्य संग ॥
कर्मांकिताऽर्थ, भवि तत्व न कारणें या ।
ज्ञानी परोपकृतितें झिजवोत काया ॥ ३२ ॥

( वसंतति० )

सौदामिनीस्फुरणचंचल भोग सारे ।

आयुष्य वायुविहताभ्रजला परी रे ॥
ऐसी जनस्थिति मनीं समजूनि वेगीं ।
हे बुद्धि निश्चळ करीं शुभ योगमार्गीं ॥ १३ ॥

( शा० वि० )

हें आयुष्य तरंगतुल्य युवता कीं दों दिसांची असे ।
हे तों अर्थ अनर्थ वीज चमके जे भोग तेही तसे ॥
कांतेचें परिरंभण स्थिर नसे टाका क्षणीं हें पिसें ।
ब्रह्मीं चित्त धरा भवांबुधि तरा हें आयका सौरसें ॥ १४ ॥

( स्रग्धरा )

कष्टें विष्टेंत पोटीं करुनि वसतसे सर्वही अंग गोळा ।
तारुण्यीं हेचि चिंता नवरत मरे कीं दुरावेन बोला ॥
काठी घेऊनि जातां चरमवयपणीं हांसती नीरजाक्षी ।
संसारीं रे सुखाचा लव मज न दिसे तूंच चित्तीं निरीक्षीं ॥ १५

( वसंतति० )

व्याघ्रीपरी भय करीत उभी जरा रे ।
देहासि रोग करिती रिपुतुल्य सारे ॥
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसें हें ।
पापें तथापि जन आचरताति पाहें ॥ १६ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

हे नानाविध भोग भंगुर वृथा तन्मूळ संसार रे ।
कां मूढा भ्रमशी तदर्थ सहसा हें सर्व आतां पुरे ॥
आशापाशशतासि टाकिं परतें कामासही हो भला ।
हा अस्मद्वचनार्थ रे जरि तुला आहे खरा मानला १७

( इन्द्रवज्रा. )

ब्रह्मादिसौख्यें तृणरूप भासती ।

हे अन्य राज्यादिक भोग ते किती ॥
कोणी महाभोग असा असे रतें ।
तेथेंच तूं टाकुनि हें अशाश्वतें ॥ ३८ ॥

श्लोक ( शार्दूलवि )

गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा ।
गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या तप्त हेमप्रभा ॥
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा म्यां देखीलें सर्व जें ।
तें ज्रेणें स्मरणास योग्य रचिलें काळासि त्या वंदिजे ३९

( शार्दूलवि० )

जेथें एक अनेक तेथ मिळती स्वाऱ्या तयांच्या तुटी ।
होतां एक नुरे सर्वेच मरती तेही नुरे शेवटीं ॥
फांसे रात्रिदिनाख्य खेळित पहा तो काळ खेळे असे ।
प्राण्यांचीच करूनियां भवगृहीं ते सोंकटी चौरसे । ४० ।

( शिखरिणी. )

गतीनें सूर्याच्या पळपळपणें माप भरतें ।
नसे व्यासंगानें दिवसरजनींज्ञान पुरतें ॥
जगीं पाहे दुःखें विविध नुपजे आस हि जरा ।
कशी या लोकाला बहुत चढली मोहमदिरा । ४१ ।

श्लोक ( शार्दू० वि० )

येतो वासर तोच तेच रजनी व्यापार नानापरी ।
प्राणी हे करिताति आयु सरतें हें नेणवे अंतरीं ॥
तुच्छें चर्वितचर्वणोपम सुखें जे तेच ते भोगितां ।
संसारीं विकृतिप्रसंग नुपजे हे कोण निर्लज्जता । ४२ ।

श्लोक ( शार्दूलवि० )

संसाराब्धि तरावया हरपदा चित्तीं न म्यां चिंतिलें ।

स्वर्गद्वारकपाटभेदक न ,तें सत्कर्म संपादिलें ॥
स्वप्नीं ही कुचभारभंगुरकटी नालिंगिली सुंदरी ।
झालों कीं निजमातृयौवनवनच्छेदीं कुठारापरी ॥ ४३ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

विद्या जे मतवादिवृंददमनी तेही न संपादिली ।
स्वर्गातें गजकुंभ भदुनि न कीं सत्कीर्तिही धाडिली ॥
कांताकोमलपल्लवाधर न तो चंद्रोदयीं सेविला ।
गेलें हें वय दीप निष्फल जसा शून्यालयीं लाविला । ४४ ।

श्लोक ( शा० वि० )

नाहीं वित्त उपार्जिलें प्रखरशी विद्या न संदादिली ।
अंभ्रातातपदद्वयें दृढमनें तेही न म्यां सेविलीं ।
स्वप्नी ही मृगलोचना शशिमुखी नालिंगिली सुंदरी ।
नेला काळ परान्नलोलुप पणें म्यां वायसाचे परी । ४५ ।

( उपजाति )

झालों जयांपासुनि ते निमाले ।
ते आमुचे तुल्यवयस्क गेले ॥
आह्मी असों सांप्रत जाण तैसे ।
नदीतटीं जर्जर वृक्ष जैसे ॥ ४६ ॥

( वसंततिलका )

आयुष्य वर्षशत त्यांत निमें निजेलें ।
त्याही निमेंत हि निमे दिन बाद झालें ॥
वार्द्धक्यशैशवपणें उरलें वियोगें ।
दुःखामयेंचि सरलें सुख काय सांगे ॥ ४७ ॥

( रथोद्धतावृत्त. )

एकदां तरुण बाळ एकदां ।

भाग्यवंत हि अभाग्य एकदां ॥
एकदां जरठ जाय सत्वरी ।
धर्मराजसदना नटापरी ॥ ४८ ॥

( रथोद्धता )

सर्पहार रिपु बंधुमोइरे ।
पुष्पतुल्य आणि मृत्तिका हिरे ॥
साम्य दृष्टि मज हो पडो तनू ।
चिंतितां शिव शिवेति हा मनू ॥ ४९ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित )

तूं राजा जरिमी श्रुतिस्मृतिमहाविद्याभिमानी असे ।
भाग्यें विश्रुत तूं मदीयकवितासत्कीर्ति लोकीं वसे ॥
आहे अंतर फार तूज मज रे तूं गर्व जैं दाविशी ।
मीही निस्पृह भाग्यवंतगणना नाहीं मला फारशी । ५० ।

( रथोद्धता )

एकलाच करपात्र नागवा ।
शांत निस्पृह असा कधीं शिवा ॥
सांग होईन खरा जसा पिसा ।
दश कर्म दहनीं हुताशसा ॥ ५१ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

हस्ता पात्र करूनि मोद बहु जो भिक्षान्नलोभें पवे ।
कोठें ही वसतो तृणासम जगा लेखी सदा लावरें ॥
ऐशा योगिजनांचि आमरण जी ब्रह्मावबोधस्पृहा ।
लाभे ती जरी मानवा शिवकृपा होईल सत्यार्थ हा । ५२ ।

( मालिनी )

धनपति जरि तूं रे मी असें शास्त्रवेत्ता ।

स्वर्गद्वारकपाटभेदक न तें सत्कर्म संपादिलें ॥
स्वप्नीं ही कुचभारभंगुरकटी नालिंगिली सुंदरी ।
झालों कीं निजमातृयौवनवनच्छेदीं कुठारापरी ॥ ४३ ॥

श्लो० ( शार्दूलवि० )

विद्या जे मतवादिवृंददमनी तेही न संपादिली ।
स्वर्गातें गजकुंभ भेदुनि न कीं सत्कीर्तिही धाडिली ॥
कांताकोमलपल्लवाधर न तो चंद्रोदयीं सेविला ।
गेलें हें वय दीप निष्फळ जसा शून्यालयीं लाविला । ४४ ।

श्लोक ( शा० वि० )

नाहीं वित्त उपार्जिलें प्रखरशी विद्या न संपादिली ।
अंत्रातातपदद्वयें दृढमनें तेही न म्यां सेविलीं ।
स्वप्नी ही मृगलोचना शशिमुखी नालिंगिली सुंदरी ।
नेला काळ परान्नलोलुप पणें म्यां वायसाचे परी । ४५ ।

( उपजाति )

झालों जयांपासुनि ते निमाले ।
ते आमुचे तुल्यवयस्क गेले ॥
आह्मी असों सांप्रत जाण तैसे ।
नदीतटीं जर्जर वृक्ष जैसे ॥ ४६ ॥

( वसंततिलका )

आयुष्य वर्षशत त्यांत निमें निजेलें ।
त्याही निमेंत हि निमे दिन बाद झालें ॥
वार्द्धक्यशैशवपणें उरलें वियोगें ।
दुःखामयेंचि सरलें सुख काय सांगे ॥ ४७ ॥

( रथोद्धतावृत्त. )

एकदां तरुण बाळ एकदां ।

भाग्यवंत हि अभाग्य एकदां ॥
एकदां जरठ जाय सत्वरी ।
धर्मराजसदना नटापरी ॥ ४८ ॥

( रथोद्धता )

सर्पहार रिपु बंधुसोइरे ।
पुष्पतुल्य आणि मृत्तिका हिरे ॥
साम्य दृष्टि मज हो पडो तनू ।
चिंतितां शिव शिवेति हा मनू ॥ ४९ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

तूं राजा जरिमी श्रुतिस्मृतिमहाविद्याभिमानी असे ।
भाग्यें विश्रुत तूं मदीयकवितासत्कीर्ति लोकीं वसे ॥
आहे अंतर फार तूज मज रे तूं गर्व जैं दाविशी ।
मीही निस्पृह भाग्यवंतगणना नाहीं मला फारशी । ५० ।

( रथोद्धता )

एकलाच करपात्र नागवा ।
शांत निस्पृह असा कधीं शिवा ॥
सांग होईन खरा जसा पिसा ।
दश कर्म दहनीं हुताशसा ॥ ५१ ।

श्लो० ( शार्दूलवि० )

हस्ता पात्र करूनि मोद बहु जो भिक्षान्नलाभें पवे
कोठें ही वसतो तृणासम जगा लेखी सदा ह्यावरें ॥
ऐशा योगिजनांचि आमरण जी ब्रह्मावबोधस्पृहा ।
लाभे ती जरी मानवा शिवकृपा होईल सत्यार्थ हा । ५२ ।

( मालिनी )

धनपति जरि तूं रे मी असें शास्त्रवेत्ता ।

भट जरि समरीं तूं मी म्हावादिजेता ॥
अनुचर जरि तूंतें सेविती छात्र मातें ।
न गणिशि मज जातों तुच्छ मानूनी तूतें ! ९३ ।

श्लो० ( शार्दूलवि० )

लक्ष्मीनें जरि तुष्ट तूं बहु सुखी मी वल्कलानें असे ।
दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे ॥
आशा ज्यास दरिद्र तोचि समजें नैराश्य पैं बाणतां ।
भाग्याचा नर कोणता मग बरें निर्भाग्य तो कोणता । ९४ ।

( कलहंस )

असतां वनीं शुभ फळें अशनाला ।
जळ शीत निर्मळ तृषोपशमाला ॥
तरुवल्कलें असुनियां वसनाला ।
वद कोण सोशिल मदांधमदाला ॥ ९५ ॥

( उपजाति )

खाऊनि राहूं सुखरूप भिक्षा ।
करूं दिशा वस्त्र पहा परीक्षा ॥
निजूं सुखें भूमितलींच शेजे ।
भूपाळ म्यां सेउनि काय कीजे ॥ ९६ ॥

( इन्द्रवज्रा )

आह्मी नसों गायक भाडमांड ।
किंवा नसों दुर्जनही प्रचंड ॥
आह्मी नसों किं प्रमदा बरी तों ।
भेटावया कोण नृपास होतों ॥ ९७ ॥

( मालिनीवृत्त. )

विपुल हृदय ज्यांचें निर्मिलें विश्व तेंही ।
निजशिरिंहि परांहिं वाहिलें सर्व पाहीं ॥
तृणसम दिघलें हें विश्व जिंतूनि एकीं ।
किंतिक असति भोक्ते गर्व कां क्षुद्रलोकीं ॥ ९८ ॥

( इन्द्रवज्रावृत्त )

गेले जिला भोगुनि भूप सारे ।
त्या भूमिलाभें तुज गर्व कां रे ॥
हें ही असो एक धरूनि खेडें ।
कां मातले हे बहुसाल वेडे ॥ ९९ ॥

( उपजाती )

संतुष्ट लोकांस करावयासी ।
कां रे मना तूं तरि खिन्न होसी ॥
प्रसन्न चिंतामणि तूंच जेव्हां ।
होसी, तुला वाण नसेच तेव्हां ॥ १० ॥

( पृथ्वी )

*पारि भ्रमसि कां निरर्थचि मना धरी शांतता ।
स्वयें स्वलिखितान्वयें घडत बा न तें अन्यथा ॥
करी न गत भाविक स्थिति विवेक कांही मना ।
स्वलब्ध सुख भोग भोग सफलां करी कामना ॥ ११ ॥

( शार्दूलवि० )

*चित्ता चिंतन सोड वैभविं असे चांचल्य ना स्थीरता ।
नाचे श्री गणिका जशी निरखुनी प्रेमें नृपभ्रूलता ॥
कंथालंकृत काय हा फिरवुनि भिक्षार्थ काशी पुरीं ।
सेवावें करपात्र-लब्ध बरवें वाटे मना भीतरीं ॥ १२ ॥

( भुजंगप्रयात )

पुढें गायनें सत्कवी पार्श्वभागीं ।
स्त्रिया टाकिती चामरें सुंदरांगीं ॥
असें जें घडे तें नसें तूं भवीं या ।
सख्या अन्यथा सोडिं संसारमाया ॥ ६३ ॥

( कुटजा )

श्रम पावसी विषयरान मरी ने ।
शुभमार्ग दुःखहर सेविं सुखानें ॥
धरिं शांततेस चपलत्व न घेई ।
न पुनर्भवाप्रति मना मज देई ॥ ६४ ॥

( स्वागता )

प्राप्त सर्व विभवें तरि काय ।
तोपिले स्वजनहि तरि काय ॥
कल्प अयुहि घडे तरि काय ।
भोगिलें सुख बहू तरी काय ॥ ६५ ॥

( शालिनी )

बहुविधधनलाभें कोणतें श्रेय झालें ।
रिपुशिरिं पद देतां काय हातासि आलें ॥
विभव परिचरांला सांग देऊनि काय ।
न अधिक जरि काया कल्पमर्याद होय ॥ ६६ ॥

( शिखरिणी )

महादेवीं निष्ठा जनन मरणाचें भय सदा ।
नसे बंधुस्नेहं स्मरकृत विकारादि न कदा ॥
वनीं राहे संगा त्यजुनि धन वैराग्य पदरीं ।
न मागावीं ऐसी मज दिसतसे अद्भुत परी ॥ ६७ ॥

( वसंतति० )

तें ब्रह्म वास्तव अनश्वर पूर्ण आपा ।
सेवीं उगाचि करेशील कुतर्क कां पा ॥
तत्सौख्यलेशलवगर्भित भोग पाहे ।
ज्यां कारणें विषय लोलुप गुंतलेहे ॥ ६८ ॥

( इन्द्रवज्रा )

आकाश पाताळ दिशा समस्ता ।
कां हिंडिती व्याध धरूनि नस्ता ॥
चिंतीं परब्रह्म मना न धांवें ।
जेणे तुला तुष्ट यथेष्ट फावे ॥ ६९ ॥

( उपजाति )

पुरे पुराणें स्मृति वेदशास्त्रें ।
आमुष्मिकें वैदिक कर्मतंत्रें ॥
जेणें सरे हा भव तें विचारीं ।
या वेगळी सर्व दुकानदारी ॥ ७० ॥

( शार्दूलवि० )

* गात्रें संकुचित स्थिती विगळिता दंतें मुखं त्यागिलें ।
लाळेनें मुखसंपुटीं भरुनिया कर्णाक्ष मंदावले ॥
भ्राते मित्र न मानिती वच, सखी सेवा करीना बरी ।
येतां जीर्ण दशा अहा सुतहि ते होताति शत्रु परी । ७१ ।

( मालिनी )

धवलकच कलापा देखुनी मस्तकीं या ।
* समजती मनिं झाली कीं जराग्रस्त काया ॥
युवपति उदपानीं अस्थिवत् मानुनी कीं ।
त्यजिति पुरुष होती दूरवाला विलोकीं ॥ ७२ ॥

( शार्दूल विक्रिडीत )

जों हे स्वस्थतनु, जरावसतसे जों दूर जों इंद्रियें ।
शक्तें, कीं सरलें न आयु पुरतें जों पंडितानें स्वयें ॥
आत्मप्राप्तिसुखार्थ यत्नकरणें कीं तोंच हो फारसा ।
होतां मंदिर दीप्त कूपखननी उद्योग तो कायसा । ७३ ।

( उपजाति० )

नदीतटीं कीं तप आचरावें
कीं सद्वधूभोगभरीं भरावें ॥
कीं शास्त्रकाव्यामृतसार पीजे ।
आयुष्य थोडें बहु काय कीजे ॥ ७४ ॥

( स्वागता )

कोण सेवन करील तयांचें ।
अश्वतुल्य चल चित्त जयांचें ॥
देह तों न अजरामर पाहीं ।
सौख्य यास्तव तपाविण नाहीं ॥ ७५ ॥

( शा० वि० )

चंद्राची द्युति रम्य जे तृणवती ते रम्य कीं भूमिका ।
साधूचा सहवास रम्य कविच्या उक्ती मनो वेधका ॥
कांतेचें मुख रम्य जें गवशिलें कोपाश्रु बिंदूत्करें ।
तेंव्हां रम्य वसेचि कीं किमपिरे हें चित्त जेंव्हां पुरे । ७६ ।

( तोटक )

वनितासुख मंदिर गान बरें ।
पद हें न रुचे कवणास खरें ॥
वसति विपिनींच परंतु मुनी ।
क्षणभंगुर हें समजोनि मनीं ॥ ७७ ॥

श्लोक ( मंदाक्रांत )

या संसारीं फिरतफिरतां फार म्यां शोध केला ।
ऐसा नाहीं पुरुष विषय श्रोत्रनेत्रांस झाला ।
जो कां ना तो विषयकरिणी भोगितां घे मदाला ।
जेणें अंतःकरणगज . . . ंग्रमें रुद्ध केला ॥ ७८ ॥

( शा० वि० )

झाले जीर्ण मनी मनोरथ पहा मी वंचलो यौवना ।
होते जे गुण सर्वही विफलते झाले गुणज्ञाविना ।
युक्तायुक्त विचारकाल न करी निःशंक सर्वात्मना ।
आतां हें सुचलें दुजी गतिनसे गौरीश पादांविना ॥ ७९ ॥

( इंद्रवज्रा )

* विश्वेश जो धूर्जटि सौख्यकारी ।
विश्वांतरात्मा प्रभु कैट भारी ॥
निर्भेदता या हृयिं, मी परी तो ।
यन्मस्तकीं चंद्र तया स्तवीतो ॥ ८० ॥

( उपजाती )

जें चंद्रिकेनें अति शुभ्र होतें ।
भागीरथीचें तट रम्य तेथें ॥
स्वानंद बैसोनि कधीं शिवातें ।
स्मरेन संसारभयार्त चित्तें ॥ ८१ ॥

( वसंतति० )

सर्वस्वदान सुखरूप करूनि हातें ।
हें सौख्य नश्वर असें समजोनि चित्तें ॥
जें चंद्रिका धवल पुण्य अरण्य ऐसें ।
तेथें बसोनि शिव चिंतन कैं विलासे ॥ ८२ ॥

( शिखरिणी )

* कदा काशिक्षेत्रीं सुरनदि तटीं कौपिन कटी ।
धरोनी या शीर्षीं जुळुनि निज हस्तांबुज पुटी ॥
उमाकांता शंभो त्रिपुर हनना बोधचि असा ।
करोनी मी केंव्हां निमिष सम मानीन दिवसा । ८३ ।

( स्रग्धरा )

*गंगास्नाना करोनी शुचि कुसुमफुलीं शंभू पूजीन तूतें ।
शीलाशय्यीं कदा मी गिरिकुहरिं भवन्मूर्ति चिंतीन चित्तें ॥
आत्मारामाऽनुरक्त स्वगुरु रत असा केधवां त्वत्प्रसादीं ।
आहा सोडीन मी ती स्मरमद हनना पूंसि सेवाउपाधी ।८४।

( वसंतति० )

शय्या मही भुजउशी नभ चांदवारे ।
शीतांशु दीप विजणे अनुकुळ वारे ॥
शांत्यंगनेस शयनीं सुखरूप भोगी ।
राजापरी निजतसे यतितो विरागी ॥ ८५ ॥

( शा० वि० )

* कंथा ती शतखंड जर्जर तरा कौपीन जीर्णाकृती ।
भिक्षेनें निरपेक्षितान्न, शयनें दावा स्मशानाप्रती ॥
शांताऽयांतःकरणें निरंकुश असा स्वेच्छें विहारा करी ।
योगीं स्थैर्य तरी किमाऽधिक नरा त्रैलोक्यराज्यांतरी ।८६।

( शिखरिणी )

* मही रम्या शय्या निजभुजलता सुंदर उशी ।
वितान स्वर्गाचें सुमति वनिता, दीपचि शशी ॥
दिशा कांता ज्यातें पवनचमरें वारिति असा ।
विरागी निद्रा घे बहु सुखद ती पार्थिव जसा । ८७ ।

( उपजाति )

गोळा असे जो अणु मृत्तिकेचा ।
जयास वेढा पडला जलाचा ॥
भांडूनियां भोगिति जे तयातें ।
धिक् त्यांस कीं मागति जे अशातें ॥ ८८ ॥

( पृथ्वी )

हिमाचलशिळेवरी सुरनदीतटीं बैसुनी ।
त्यजूनि जनसंगती सुदृढ बद्धपद्मासनीं ॥
सुखेंकरुनि डोळतां प्रचुरयोगनिद्राभरें ।
कधीं डवरिती मला हरिणपोत शृंगांकुरें ॥ ८९ ॥

( भुजंगप्र० )

तळीं भार कूर्मापरी जे न घेती ।
ध्रुवाचेपरी ऊर्ध्व मेढा न होती ॥
वृथा जन्मती पावती नाश तैसे ।
मधें उंबराच्या फळीं जंतु जैसे ॥ ९० ॥

( भुजंगप्र० )

तृषा बाधितां स्वीकरी तोयपानें ।
क्षुधासंभवीं भक्षितो षड्रसान्नें ॥
अनंगानळें तप्त कांतेसि भोगी ।
भ्रमें औषधी मानितो सौख्य रोगी ॥ ९१ ॥

( शिखरिणी )

* स्थिती पुण्यारण्यीं परिचय मृगाचा घनवनीं ।
फळें ती शाल्यन्नें उपलतल शय्या प्रतिदिनीं ॥
पुरे ही सामग्री गमत शिव भक्तांप्रति तया ।
वनें वा धामें ही दिसति सम कीं शांत हृदया ९२

म. ग्रं. सं. [redacted]

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

